# पूर्वा

(निसर्गपर काव्यसंग्रह - भाग ३)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**पूर्वा** (निसर्गपर काव्यसंग्रह - भाग ३)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२, कवितांच्या बागेसमोर,
ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस, वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : चैत्र शु. ९, श्रीराम नवमी, शके १९४६
बुधवार, दि. १७ एप्रिल, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-971022-1-9

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ २००/-

कविता या कवयित्रीचे स्वयं सर्जन असून कविता तयार झाल्यानंतर तिच्या सोबत वापरण्यात आलेले चित्र हे केवळ साहित्यिक आनंदासाठी वापरण्यात आलेले आहे. यात कुणाचाही कॉपीराईट भंग करण्याचा मुळीच हेतू नाही. या सर्व कवितांचा उद्देश भाषेचा प्रसार व प्रचार इतकाच आहे.

# समर्पण



**ज्यांच्या कवितांचे भारतातच नव्हे तर जगभरातून कौतुक होत राहिले.
धर्म, देश, स्त्रीस्वातंत्र्य इत्यादींवर ज्यांच्या कविता असल्या तरी
निसर्गावरील कवितांना ज्यांच्या कवितेत प्रथम स्थान मिळाले आहे,
दु:खातही ज्यांच्या निसर्गकविता त्यांच्या दु:खस्पर्शाने चमकतात
त्या सरोजिनी नायडू यांना हा माझा निसर्गपर काव्यसंग्रह
सादर समर्पित !**

# मनोगत

अनेक वर्षांच्या निसर्गाच्या सान्निध्याचा परिणाम प्रत्येकाच्या मनावर वेगवेगळ्या प्रकारे होतच असतो. पण कवीचं मन हे त्याहून निराळं असतं. निसर्गातल्या साध्या साध्या क्रिया सुद्धा कवी मनाला भुलवत असतात आणि त्याच्या मनाला फुलवतही असतात. नकळत एखादं बीज पावसाच्या धारेने रुजून यावं, त्याला अंकुर फुटावा, त्याला पालवी यावी आणि त्याचं झाडावेलीत रूपांतर व्हावं तसंच काहीसं कवितेचही होतं.

कवीच्या मनात खोल कुठेतरी बीज रूपाने असलेल्या भावना या वेगवेगळ्या प्रकारच्या निसर्गकृती पाहून फुलू लागतात, डुलू लागतात आणि डोलूही लागतात. निसर्ग हा माझा अत्यंत लाडका प्रांत. खरं तर दुःखावर फुंकर म्हणा, सुखाचा आधार म्हणा, डोळ्यांना साकार म्हणा, हा निसर्ग प्रत्येक क्षणी लोभसवाणा वाटतो.

झाडं वेली, पानं फुलं, चंद्र सूर्य, तारे आकाश, ऋतू, वेळा, क्षितिज, प्रकाश, अंधार या साऱ्या गोष्टी कवितेत उतरतात आणि त्याचे एक सुरेख काव्यचित्र तयार होते.

माझ्या मनात ठरवून एखादी कविता लिहावी असं कधीच येत नाही, तसे होतही नाही. आपसुक, सहज ती अशी अलगद उतरते आणि ती तिच्याच भावनांच्या आंदोलनात मलाही झुलवत राहते. मला वाटतं माझ्या सर्वाधिक कविता ह्या निसर्गावरच्या आहेत आणि अनेक वर्षांपासूनच जे माझं साहित्यिक व्रत आहे त्यात या निसर्गकविता सातत्याने आपलं अस्तित्व निर्माण करीत आलेल्या आहेत.

कधीतरी वाटतं की या कविता म्हणजे त्या त्या क्षणांचे माझे भावतरंगच आहेत ना ! ते केवळ माझे न राहता आता रसिकांचे होतात आणि रसिकांच्या आत्मानुभूतीला साक्षी ठरतात यातच कविता सार्थ होते. वेद आणि वेदना दोन्ही जाणल्या की कळतात, कळल्या की उमजतात, उमजल्या की आपल्या वाटतात;

निसर्ग असाच आहे. या अथांग निसर्गाच्या सौंदर्याला कवेत घेताना नकळत झालेला हा काव्यप्रवास अनेक वर्षांपासून काव्यसंग्रहाच्या रूपात यावा असे वाटत होते.

कविता उतरण्याची जशी वेळ नसते तसेच तिचे पुस्तक होण्याचेही काही सांगता येत नाही आणि अनेक वर्षांच्या या निसर्गकवितांचा हा काव्यसंग्रह रसिकांच्या ओंजळीत भरभरून देताना मला समाधान वाटते आहे.

माझ्या कवितांवर रोज प्रेमाचा वर्षाव करणाऱ्या हजारो रसिकांच्या सदिच्छांचाच हा परिणाम आहे असे मी मानते.

पुन्हा तिथे रमणे आणि पुनश्च रसिकमनावर निसर्गाचं गारुड पाहण्यासाठी जणू हा काव्यसंग्रह उत्सुक आहे असे वाटतेय. खात्री वाटते की माझ्या अन्य काव्यसंग्रहांप्रमाणेच या काव्यसंग्रहालाही रसिकहृदय-सिंहासनाचा ठाव मिळेल.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

उत्साहाचा खळखळणारा झरा या शब्दात ज्यांचे वर्णन करता येईल त्या डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे. अनेक गुणांचा वर्षाव करून परमेश्वराने डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना समृद्ध केले आहे. काव्य रचनेचे कोमल अंत:करण असणाऱ्या डॉ. मंजूषा या अनेक भाषाकोविद आहेत. सहजतेने त्या इतर भाषांमध्येही वाङ्मय निर्मिती करीत असतात. दररोज कोणत्या तरी काव्याला जन्म देऊन वाङ्मय समृद्ध करीत असतात.

त्यांचं शब्दांचं भांडार मोठं आहे. आपल्या वाङ्मयातून जीवनाचं सत्य, भावनांचा आविष्कार, मानवी मनाचे पैलू त्या अभिव्यक्त करीत आहे. दररोज येणारी सकाळ खरं तर तीच ती असते; परंतु मानवी जीवन, मन परिवर्तनशील असल्याने प्रत्येक सकाळ नवीन रूप घेऊन येते.

'भेटू पुन्हा नव्याने मधुमास नवा वाटे' कवितेतील अनामिक ओढीने मधुमास नवीन वाटायला लागतो. अनामिक हुरहूर हा तर जीवनातील दोन जिवांचा बांधून ठेवणारा कोमल परंतु घट्ट बंध ! म्हणूनच 'गाव राजसाचे दूर' या कवितेत कवयित्री म्हणते 'जीवा जाळे हुरहूर' या कवितेत थोड्या शब्दांत जीवनाचा आशय अभिव्यक्त झाला आहे. या साऱ्या कवितांचे रसग्रहण करून रसिकांसमोर यायला हवे !

या कवितांमध्ये रसिक निश्चितच हरवून जाईल हे निश्चित. या कवितासंग्रहाच्या प्रकाशनासाठी अनेक शुभेच्छा ! अशीच वाङ्मय निर्मिती इष्ट कलागुणांना जोपासत होत राहो ! ही परमेश्वर चरणी प्रार्थना !

**– रवींद्र मुळे**

माजी संचालक, संस्कृत प्रगत अध्ययन केंद्र,

सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ

# अनुक्रमणिका


१) बहरून आला बहावा ... ११
२) स्थाने काही उरात उरती... १२
३) गंध जगण्याचा यावा ... १३
४) सर्ग निसर्ग हासरा ... १४
५) सागर भिनवुन मनात माझ्या ... १५
६) स्वप्नं रोज कांचनाचं ... १६
७) त्याचा चैतन्याचा चाळा... १७
८) सात रंगांची रंगाळी ... १८
९) पावसाळी ही पहाट ... १९
१०) सर थेंब मोतीयाची ... २०
११) जगणे असते असे ताटवे... २१
१२) मन पाऊस पांघरी ... २२
१३) ही बहार अशी ... २३
१४) वारी रानामंदी करू ... २४
१५) होती बहार जेव्हा ... २५
१६) भावभक्तीच्या उंबरठ्यावर ... २६
१७) हा वृक्ष डेरेदार ... २७
१८) या अशा पावसाळी ... २८
१९) स्वप्नं वाटते इथे थांबले... २९
२०) असे हसावे मनमोकळे ... ३०
२१) चित्रकारे घुसळल्या ... ३१
२२) एक आपलं आकाश ... ३२
२३) अशी एक सांज ... ३३
२४) माझा कोकण मायाळू ... ३४
२५) मंद फिकटसे हास्य ... ३६
२६) नभ मोकळे झालेले ... ३७
२७) अशी कांती तेजाळली ... ३८
२८) स्थाने काही उरात उरती... ३९
२९) पायवाट ... ४०
३०) अशी कांती तेजाळली ... ४२
३१) शिकवण वैशाखाची ... ४३
३२) दुःख बोलके वसुंधरेचे ... ४४
३३) माय डोंगराची माया ... ४५
३४) या घराच्या भोवताली ... ४६
३५) निळी मदमस्ती ... ४७
३६) पाझर ... ४८
३७) मोती शिंपल्यातला ... ४९
३८) इच्छा दुर्दम्य ... ५०
३९) रंगीत दुलई ... ५१
४०) फिक्या रंगांची शोभा ... ५२
४१) गगनचुंबी वृक्षराजी ... ५३
४२) नव्या दिसाची नवी सुरुवात ... ५४
४३) आपण दोघी बहिणी ... ५६
४४) इंद्रधनू शेतात उतरले ... ५८
४५) फुले अळुमाळू ... ५९
४६) दिवस उजडतो चैतन्याने... ६०
४७) क्षितिजावरची लालिमा ... ६२
४८) डेरेदार झाडं ... ६३
४९) रम्य वास्तू ... ६४
५०) पावसाळी पेरणीला ... ६५
५१) दिनकर नीलांगणी ... ६६

५२) चहाचे मळे ... ६७
५३) झरोका झरोका ... ६८
५४) बाग जांभळी गुलाबी ... ६९
५५) कलश फुलांचा ... ७०
५६) तुझं माझं घरटं ... ७१
५७) पाऊस यावा म्हणून ... ७२
५८) डोंगर खोदून वळणवाट... ७४
५९) उंच उंच वनराजी ... ७६
६०) जरी असलो मी काटेरी... ७७
६१) झाडायेलींच्या हिरवाईत... ७८
६२) जळकोंडातून जळ निर्मळ...७९
६३) सत्त्वभाव चांगला ... ८०
६४) इतिहासाचे भव्य पुरावे ... ८२
६५) हास्य मुखीचे ... ८३
६६) रम्य सुंदराचे भास ... ८४
६७) प्रचंड लाटा ... ८६
६८) कमाल निसर्गाची ... ८७
६९) अवघा पिंपळवृक्ष उभा ... ८८
७०) मयूरबन ... ९०
७१) राधा योगिनी ... ९१
७२) झुंजुमुंजु पहाटंला ... ९२
७३) घर माझे स्वप्नीचे ... ९३
७४) गिरिराज सुंदर ... ९४
७५) हिरव्या गवत पात्या ... ९५
७६) फुलांचे किती प्रकार ... ९६
७७) स्वच्छ सोनेरी उन्हानं ... ९७
७८) मन उघडते दार कोंडले... ९८
७९) प्रीत उधाण उराशी ... ९९
८०) ओजसाचा धरू कर ...१००
८१) पहाट ओली
दवात न्हाली ...१०१
८२) माळ दवांची उरते ...१०२
८३) ह्रदयाकाशी प्रकाश ...१०३
८४) अहा ! केवढे रम्य
हे दृश्य ...१०४
८५) पानोपानी रंग हिरवा ...१०५



## (१)
### बहरून आला बहावा

असा निघळला स्वर्गामधला
कुबेर खजाना पहावा
मोजीत असता धरी कोसळला
बहरून आला बहावा

लखलख सोने पुष्प जाहले
स्वर्णभूषण नाव
जानकीस प्रिय कर्णी घालण्या
कर्णिकार घे ठाव

अलंकारांनी मढलेला कुणी
राजा लोभसवाणा
राजवृक्ष म्हणे कुणी आरेवत
शरीरा ठेवी देखणा

आरग्वध, शम्पाक, व्याधीघात
रोगा शमवून जाई
चतुरंगुल, कृतमाल, सुवर्णक
दीर्घफल, नाम घेई

स्वर्णभूषण अन् स्वर्णांग
कांचन अंगी पसरते
जणू उषेचे पिवळे दूकुल
अडकून यावर झरते

ती शिवानी साजामध्ये
तुलाच मढवून घेते
आणि शिवाच्या हृदयामध्ये
अलगद गढून जाते

अमलताश तू आण वसंता
उष्मा होई सुसह्य
फुले पाहुनी मृदुल रेशमी
प्रीतभावना असह्य

हळद माखली अंगोपांगी
लाजे वधू बावरी
अन लज्जेचे वसन पीत हे
पिवळ्या हाती सावरी

असा बहावा गाली फिरावा
शहारून येईल अंग
लाडिक लज्जा चरमसीमेला
लेईल सुवर्ण रंग

दि.२८/०४/२१
दुपारी ०५.११ वा.



## (२)
## स्थाने काही उरात उरती

कधी कुठले हे काठ बोलके
पडले ओसाड
शैवाळाच्या थराथरातून
एक मुकी साद

जलाशयाच्या भवती आखीव
बांधीव रचना ही
कधी माणसाचीही होती
येण्याजण्याची

हिरवी हिरवी दाट झाडी ही
काठाकाठाने
रंग डोकवतो कंच हरित हा
जळात थाटाने

एक अनामिक ओढ ओढते
मजला ही शांती
कधी वाटते माहीत यांना
गतजन्म भ्रमंती

पुन्हा एकदा जळात वाकून
प्रतिबंबा पहावे
पायरीवरती टेकून थोडे
मोकळे की व्हावे

स्थाने काही उरात उरती
बंध ओळखीचे
उगाच कोणी आपुले होते
जरी अनोळखीचे

दि. १५/०५/२१
रात्री ०९.११ वा.



## (३)
## गंध जगण्याचा यावा

वर दाटलं आभाळ
खाली सरोवर चिंब
ढग पाहतात खाली
जळी निज प्रतिबिंब

ऐसपैस पसरला
जरा निवांत डोंगर
त्याची हिरवी दुशाली
रूप दिसते सुंदर

काठी घरकुल उभे
सृष्टीराणीच्या कुशीत
दार पापण्या मिटून
आत स्वप्नं खुशीत

त्याच्या भवताली सारा
तृण गालिचा पसरे
चालताना मऊशार
स्पर्श काट्यांचा विसरे

अशी देखणी नाजूक
पायवाट नागमोडी
जणू हातावर रेखा
आयुष्याची कुणी काढी

दूर पांघरे नीलम
रंग अंगावर नग
त्याची ओढ मोहनाची
फिरणारे मोरपीस

अशी डोलती चैतन्ये
गंध जगण्याचा यावा
सूर आसमंती नाद
ऐकू येई बघ पावा

दि.१६/०५/२१
सकाळी ०८.२७ वा.




## (४)
## सर्ग निसर्ग हासरा

सर्ग निसर्ग हासरा
सुंदर दुलई आवरण
कोमल करांनी जपू या
चला आपुले पर्यावरण

सूर्य उगवतो पूर्वेला
आभा पसरते जगण्यात
रजनी चांदण्या लेऊन
न्हाती धुती चांदण्यात

उडती आकाशी पाखरं
गाणी आनंदी गाऊन
वहाती नद्या धबधबे ही
झरे येती खळाळून

डवरून फुलांच्या गोंदण्या
डुलती झाडं न वेली ही
हिरवी तृणांकुरे बाळे
बिलगून आईला खेळती

सारे ऋतूंचे सोहळे
भाव तरल नि कोवळे
गंध मातीचा दिगंती
पंचप्राण सुखावले

सृष्टी माय अशी आपुली
देता कधी न थकली
आपण हानी पोचवता
ती त्या दुःखानं वाकली

नको खोदणं डोंगर
खोल जमीन पोखरणं
दूषित हवा पाणी वायू
विष हे निसर्गी घोळणं

पर्यावरण प्रेम माया
त्याला मायेनं जपावं
धरणी माईला आपुल्या
झोकं सुखाचं झुलवावं

दि.०५/०६/२१
सकाळी ०८.५३ वा.
जागतिक पर्यावरण दिनानिमित्त



## (५)
## सागर भिनवुन मनात माझ्या

आज उभी एकली काठी मी
हे सागर राजा बा
उधाणलेल्या लाटा माझ्या
आत किती रे पहा ना

तुझ्यासारखी मीही वरवर
किती सौंदर्या ल्येते
आत जाळती वडवानल का
कोणाला ते कळते

दुःखे सारी सखोल गहिरी
अथांग होते मीही
रडते तेव्हा ओघळणारे
अश्रू मोती तरीही

वाटे हास्य हे फेसाळणारे
त्या वेदना उफळत्या
दूर नभातील कठोर चांदवा
भरती ओहोटी  वेदना

तीरही नसतो माझा कधी हा
आपटून येती लहरी
पाषाणेही वरून ओलसर
आत कोरडी सारी

तुझ्यासारखे सामावून ते
सारे सारे घेते
तरी अशी मी रुचीहीन का
लेखी साऱ्यांच्या होते

आज ठरवले वाऱ्यावरती
उडू दे चिंता साऱ्या
सागर भिनवुन मनात माझ्या
तहानलेल्या धारा

दि.०८/०६/२१
रात्री ११.११ वा.



(६)
## स्वप्नं रोज कांचनाचं

लख्ख सोनेरी रेशमी
ओढ ओढून दुशाली
रोज उन्हाच्या कोवळ्या
पसरती या खुशाली

झाडं तरतरतील
जरा शिरशीरतील
एक नवी सुरुवात
जीवनात आणतील

पान पान सोनचाफी
हिरवाईचा सोहळा
हासू लाजून लाजलं
सोनं सोनेरी बोहला

स्वप्नं रोज कांचनाचं
नीज सुवर्णाची होते
एक सकाळ वेडी ही
समर्पणाची की होते

गूज गुपित प्रभाती
लपवून सारे हाती
करी उधळून सोनं
किरणं सूर्याची ही जाती

दि.११/०६/२१
रात्री ११.३२ वा.



## (७)
## त्याचा चैतन्याचा चाळा

खुणा पावसाच्या अशा
थोड्या ओलीतीच्या बघा
दव थांबती पातीशी
स्नेह ओलावा जपता

माना टाकलेली रोपं
गवताच्या काड्या झाल्या
एक जाळता ऋतू हा
नंगानाच करू गेला

झालं गेलं संपलं की
आता काही ना उरलं
तेवढ्यात पावसानं
सारं आभाळ भरलं

आल्या सरीवर सरी
लगबग भरभरी
जीव गेलेल्या जगात
नवजीवनाची झारी

असा उनाड ऋतू हा
त्याचं नाव पावसाळा
देतो संजीवनी पहा
त्याचा चैतन्याचा चाळा

दि.१५/०६/२१
सकाळी ०८.०७ वा.



## (८)
## सात रंगांची रंगाळी

माझ्या रानाला सांधतं
उंच मोकळ्या आभाळी
असं धनुष इंदरी
सात रंगांची रंगाळी

त्याला मोहात पाडतं
माझं समदं हिरवं रान
किती रमलंया हितं
इसरून सारं भान

डोंगराच्या अंगावर
उपरण रंगारंग
अभिषेक त्यो होतोया
सर्गातली गंगा दंग

जवा वरुण राजाला
धीर धरवत न्हाई
सुर्व्या किरणांना त्याच्या
संग खेळवत न्हाई

इंदर राजा सर्गाचा
त्याची लगबग झाली
सरी सोडताना खाली
धनुषाची ओळ आली

नेम लागला लागला
थेंब बाण सरसर
ओली धरणी ही झाली
पेरा घ्यावा भरभर

दि.१७/०६/२१
सायं ०६.१३ वा.



## (९)
## पावसाळी ही पहाट

चिंब पावसाची वाट
धुंद प्रभातीचा थाट
सांज भास झाकोळले
थेंब सारे विसावले

कोसळून थकले का
नाही खेळले खेळले
थेंब वाट्टेल तसे ते
मुक्तपणे बागडले

वाट जशी ओली झाली
स्वप्ने जागेपणी आली
गंध अत्तरे लेऊन
दरवळा जाग आली

बीज पहुडले होते
प्रीत पांघरून मनी
अलगद अंकुरले
सरी येताच अंगणी

थोडी शिरशिरी येई
अंग चोरते ना भुई
परी गीत मनातले
तिचे रोमरोम गाई

पावसाळी ही पहाट
झोप साखरेची येई
सखी उठविण्या येता
निज गुलाबीच होई

दि.२२/०६/२१
सकाळी ०८.३३ वा.



## (१०)
## सर थेंब मोतीयाची

थेंब ओघळून आले
जरा विसावण्या इथं
झडलेली पालवी न
झाड ओसाड वाकलं

त्याचं दुःख कुणा कळे
पानगळल्या जखमा
तनु शृंगारली कधी
आता उरलेल्या खुणा

आल्या सवयीनं सरी
खुली झाडाची ओसरी
जरा भकास उदास
त्याच्या पानोपानी चरी

मग रूप मोतीयचे
थेंब थेंब पांघरून
झाड लगडून गेले
थेंब थांबून रमून

एक इटुकले पान
ऋतू मागचा लेऊन
नव्या चांदण्यांच्या नभी
गेले चिंब ओलावून

सर पाण्याची पाण्याची
सर थेंब मोतीयाची
सरसर सुख आले
बरसात चांदण्यांची

दि.२५/०६/२१
रात्री १०.४९ वा.




## (११)
## जगणे असते असे ताटवे

असे ताटवे मना मोहविती
क्षणात फुलेच व्हावे
वाऱ्यावरती सुगंधगाणे
खुशीत डोलून गावे

कधी वाटते गुलाब व्हावे
प्रिय हृदयी विलसावे
कधी रंग वेगळेच लेऊन
अलगद उमलून यावे

आकारांची अशी विविधता
परिमळणे हुंगावे
उगाच येथे वाट वाकडी
करून कधी गुंगावे

विसरून जावे ताणतणावा
नयनसुखाची सरिता
कधी प्रियेच्या अधरांसम दल
भाव मनीचे भरता

जगणे असते असे ताटवे
फुलवून आणु कुसुमा
राखून ऐसे सुंदर बगीचे
जीवन हो अनुपमा

दि.२६/०६/२१
दुपारी १.३१ वा.



## (१२)
## मन पाऊस पांघरी

कळी भिजली भिजली
मनी उमलून आली
अंगावर दवबिंदू
माळ मोतीयाची झाली

ऋतू भिजण्याचा आला
गंध मातीचा सुटला
निजलेल्या बिजागरा
कवळा अंकुर फुटला

गर्भार वसुमती
सस्य तिची हो संतती
तरारून उगवती
साऱ्या धान्याच्या प्रजाती

मळे फुलांचे फुलती
फळबागा हो डोलती
घरादाराच्या छताशी
थेंब सूरही धरती

पानोपानी गुज ओले
ओली पाकळी पाकळी
धुंद वाहतो शरीरी
वारा अत्तरांच्या कुपी

असे लावण्य हे चिंब
खट्याळाच्या प्रीतसरी
तनू भिजली मनीही
मन पाऊस पांघरी

दि.३०/४/२१
सकाळी ०७.५४ वा.



## (१३)
## ही बहार अशी

किती रम्य निसर्ग रे साजणा
ही बहारही फुलवी रे माझ्या मना
कुठे आलो आपण खुशी वेगळी
तुझ्या रूपे सौख्ये सारी लाभली

तव अधरावरती दामिनी
चेहऱ्यावरती केशघन घनी
तुझ्या कस्तुरीच्या या गंधात मी
जणू मूर्त तू संगमरवरी

माझ्या साजणा मी तुझी चांदणी
नयनी छेडून दे तू अशी रागिणी
किती रम्य निसर्ग रे साजणा
आलो आज आपण कोठे पहा

हे बंधन जे प्रेमाचे
कधीही न तुटू दे साजणी
ही साथ जन्मांची रे
कधीही सुटू ना दे साजणा

तुझ्यापाशीच माझे जगणे आता
तुझ्या पापण्यातून मिटते मला
किती रम्य निसर्ग रे साजणा
आलो आज आपण कोठे पहा
या बहारी मनाची कळी खुलली गं
तू मला लाभला सृष्टी मज लाभली

असे वाटते मजला प्रिया
हृदयांतरी तुज साठवू
या मदमस्त रजनीसवे
तुजला मी माझी गे म्हणू

तुज वादळे अंतरातली
दिसती मला काही रे सजन
प्रीत तुजवरी माझी गे
जीवापाड राहील अनुपम

किती रम्य निसर्ग रे साजणा
आलो आज आपण कोठे पहा
या बहारी मनाची कळी खुलली गं
तू मला लाभला सृष्टी मज लाभली
माझ्या साजणा मी तुझी चांदणी
नयनी छेडून दे तू अशी रागिणी

दि.०२/०७/२१
सकाळी ०८.५३ वा.



## (१४)
## वारी रानामंदी करू

चल करू टेहळणी
झाली कवाच पेरणी
कुटं कुटं कणसाची
सुरू झालीया तोडणी

बागबगीचा धुंडाळू
पेरू पिकले का पाहू
दोघं डहाळीशी झुलू
गोड मिठू मिठू बोलू

हिरवं हिरवं रान बघ
जरा हुशारीनं वाग
खाऊ मजेत मिरची
मारू दाण्यावर ताव

अर्धे अर्धे खाऊ फळं
जरा अंगा येई बळं
माणसाला नच कळं
पाखरांची हो चंगळ

विठू विठू बोल बोलू
झाड पंढरी ही चालू
गोड नाम ओठी धरू
वारी रानामंदी करू

दि.०३/०७/२१
रात्री १०.४९ वा.

## (१५)
## होती बहार जेव्हा

होती बहार जेव्हा
फुलले मळे कित्येक
अगणित पुष्प फळेही
लगडून ती अनेक

हे रंगरूप माझे
होते तवाणे ताजे
शृंगार हिरवाईचा
गुंजन पक्षी गाजे

ही पल्लवांची कोंबे
मृदु रेशमी तो स्पर्श
अंगास ये शहारा
वासंती हा उत्कर्ष

फांद्या त्या वाकलेल्या
पानाफुलांच्या ओझे
येती दुरून पांथ
विश्राम घेण्या येथे

टेकून बुंध्याशी या
छायेत घे विसावा
देई मी अगदी सर्वा
ही आस हा दिलासा

जाता बहार आता
मी एकलाच येथे
पानेफुलेफळे ना
गेले ते पक्षी कोठे



ना दिसती पांथ येथे
टाळून दूर जाती
दृष्टीही त्यांची विरस
आतून बोचे मजसी

होती बहार जेव्हा
गोकुळ नांदलेले
माझेच श्वास आता
आहेत कोंडलेले

तरी पाहतो स्वतःला
शिशिरातल्या क्षणी या
येईल ऋतू माधव
आतून रस ओला

माझ्या मनात फुलतो
आधी वसंत वेडा
मग अंगाखांद्यावरती
सृष्टीच्या रम्य उड्या

आतून जपणे सारे
वरवरचे गळते जे ही
जीवनरस वाहो
ते आत्मतत्त्व पाही

दि.०३/०२/२१
सकाळी ११.२१ वा.




## (१६)
## भावभक्तीच्या उंबरठ्यावर

मुळात रुजल्या मूळ कथा ह्या
डोलारा त्यावरी उभा
भावभक्तीच्या उंबरठ्यावर
पिढ्या विनम्र जुन्या नव्या

प्रांगण मोठे पाया कणखर
मंदिर शोभे कलाकुसर
घट्ट मुळांशी घट्ट संस्कृती
घट्ट विचारही अग्रेसर

वृक्ष मुळांनी तगला आहे
तगली येथे परंपरा
मिळे वारसा घट्ट विचारा
मूळ पोसते धुरंधरा

उभा मागुती वृद्ध मुळासम
पुढती त्याचा काळ नवा
अंकुर फुटले नव्या विचारा
तरी जुन्याचा ठाव हवा

डेरेदार हा तरू नांदतो
पल्लव खेळे अंगावर
ताकद देती मुळे तयाला
पानफूलफळे फांदीवर

मूळ न सोडे प्रकाशण्याचे
चंड प्रचंड हा मार्तंड
मूळ गुणांना तेजाळू या
मुळात मुळे मुळवूनी उदंड

जिथे मुळांना मिळते शक्ती
भव्य भार आवार तिथे
जीवापाड जपण्यास मुळांना
जगण्याचा विस्तार इथे

मुळे आपुली राहून घट्ट
तत्त्व वाहतील सार खरे
नाळ न तोडू आपुल्या मुळांशी
मुळातून जगणेच खरे

दि.३०/०३/२१
दुपारी १२.११ वा.



## (१७)
## हा वृक्ष डेरेदार

हा वृक्ष डेरेदार
शेताचा हो आधार
की पूर्वजांचा आशीष
त्या रुपात साकार

कसता जमीन याची
खुण सांगे रोज जगाला
हा शेतकरी दुरुनही
पाहून निश्चिंत याला

रणरण उन्हात याची
साथीस असते छाया
शेतासवे हा वृक्ष
करतो आम्हावर माया

अंगाखांद्यावर खेळून
फांद्याफांद्यांवर लोळून
झाली लेकरं मोठी
उन्हं दिली ना याने पोळून

लपाछपी इथं लगोर
बालक्रीडा मनविभोर
एक शांत निवांत दिलासा
बिनमेघी नाचे मनमोर

करी पिकाची राखण
शेताचा खरा पाठीराखा
हा असा विस्तीर्ण मोठा
जिवलग भाऊ अन सखा

किती पिढ्यांचा पाहून मेळा
आजही खुलतो रानी
वृक्ष नसे हा केवळ साधा
परंपरा अभिमानी

दि.०९/०२/२१
दुपारी ०२.०५ वा.



## (१८)
## या अशा पावसाळी...

या अशा पावसाळी... पावसाळी...
भावनांच्या रे होड्या
मन बसून त्यातून करीतसे
पावसासंगे लाडिक खोड्या

चिंब ओले घर चिंब झाले दार
साचले पाणी तेथे तळे गारगार
अंगास भिजवून त्या पावसात
ज्या मारल्या आठवा त्या उड्या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

कधी कागद रंगीत ते मिळावे
कधी वर्तमान पत्र फाडून घ्यावे
किती घाई घाई बनवून नावा
शिरशिरी अंगात स्वप्नाळू थोड्या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

साऱ्यांनी केल्या नि सोडून दिल्या
वाहत दूर सांगा कोणाच्या गेल्या
मन गेले कोठे होड्यांसवे या
ते रम्य बाल्य खुणावी न वेड्या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

उगा मोठे झालो नि नियमात गेलो
स्वच्छंद जगणे हरवून आलो
ते थेंब तो गारवा तो ओलावा
मनाची तळी भावना कोरड्या या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

माणूसपण न कळताच होते
कळले न सारे मनुपण हरवले
या पावसाची दुरूनच भलावण
परतून जाती सरीही सड्या या
त्या पावसाळी भावनांच्या रे होड्या

दि.११/०२/२१
रात्री ११.४३ वा.




## (१९)
## स्वप्नं वाटते इथे थांबले

स्वप्नं वाटते इथे थांबले
झाडांवरती थोडे
गुरफटून ते अधिकच होते
गोड गुलाबी कोडे

कशी सोडली हिरवळ पाने
क्षणात या तरुराजे
रंग गुलाबी घे पांघरुनी
रूप वेगळे साजे

कधी वाटते सोडून द्यावे
तेच ते नियमित जगणे
कधी लिंपावे रंग वेगळे
भिन्न थोडे वागणे

पायवाट ही आपणच आपुली
सडा टाकुनी पहावी
रंग वेगळा शिंपडून त्या
प्रसादाशी न्यावी

मन प्रसन्न चित्त प्रफुल्लित
शृंगाराचा वसंत
अंतःकरणा अशी मिळू दे
लाडिक एक उसंत

तूही सोडून रंग तेच ते
रंग वेगळे घ्यावे
जीवनवाटेवरती माझ्या
फुले पेरूनी जावे

थकले मी रे काट्यांवरूनी
हासंत चालचालुनी
आता लाभू दे दुलई मऊमऊ
सुख दे तू अंथरुनी

तनमन माझे, मीही गुलाबी
तूही गुलाबी, स्वप्नं गुलाबी
दिशा गुलाबी, नजर शराबी
रंग गुलाबी, हास्य गुलाबी

स्वप्नं ठरू दे सत्य हे लोभस
सत्य स्वप्नं होऊ दे
कष्टंही माझे होत गुलाबी
विलयाला जाऊ दे

दि.१५/०३/२१
दुपारी १२.४५ वा.




## (२०)
## असे हसावे मनमोकळे

असे हसावे मनमोकळे
असे निरागस फुलून यावे
असेच अलगद झोकून देऊन
असे वाऱ्यावर झुलून घ्यावे

असे कळ्यांना चित्र दाखवत
द्यावी प्रेरणा उमलावयाला
जेव्हा फुलणे पूर्णपणे मग
अंगी भिनवू या जगण्याला

रंग कोणता अधिक गडद नसो
मग यशाचा अभिमानाचा
फिक्या असाव्या छटा या सगळ्या
मंत्र ध्यानी ठेवू सुकण्याचा

अल्पकाळ हे टिकते सारे
कशास हुरळून जावे क्षणभर
सौंदर्याची टिमकी नको ना
नको गर्व हा मनात घरभर

हास्य असे ना असते शाश्वत
दुःख किनारी त्याचे गलबत
दुःख तरी बघ कुठे निरंतर
हर्षसागरी नावा झुलवत

जे जे आहे नाही आपुले
कुणीतरी तो महान दाता
कृतज्ञ राहून पळापळाला
श्रेय त्याचे ते त्याला देता

आपण केवळ आलो येथे
आनंदाची बाग फुलावी
सुकून मातीमध्ये गळुनी
काया पुन्हा ही मृन्मयी व्हावी

या मातीला गंध मिळावा
सत्कर्माच्या अत्तरकुपीचा
तिच्या कणातून पुन्हा झरावा
शीतल गंधित असा गारवा

पुन्हा बिजाचे अंकुर व्हावे
एक रोपटे भरभर वाढे
हळूच डोकवी कळी ही कवळी
पुन्हा फुलांचे पडू दे सडे

चक्र सुरेख नि नियत हे असते
कधी खाली ते वरंही जाते
वरचे खाली येताना मग
उगा खंत का मनी वाटते

उसळून येईल पुन्हा दिमाखे
ऋतुराजाला अंगी घेईल
पुन्हा एकदा फक्त फुलावे
क्षणात जगणे सुंदर होईल

दि.०७/०३/२१
सकाळी ११.४७ वा.

## (२१)
## चित्रकारे घुसळल्या

निळ्या हिरव्या पिवळ्या
साऱ्या छटा मिसळल्या
रंग तबकडी नभ
चित्रकारे घुसळल्या

एक फटकारा ओढी
कुंचल्यातून आपुल्या
चित्र रोज मुक्त होई
देत प्रकाश सावल्या

नभ पिवळे धम्मक
डोंगराला नील कांती
हिरवी गडद झाडेही
तृण पोपटी पोपटी

पुष्कराज नभांगणी
राशी नीलम डोंगरी
पाचू हिरवे हिरवे
वृक्षांवरी भुईवरी

कधी वाटते वाटते
आकाशाला दुलईत
पितांबरी पांघरून
पहा झोपलेले इथं

पहाडांनी निळीशार
जाड कंबळ ओढली
अंग जाडं भरडं हे
आत भरली हुडहुडी



झालं वेली ताजी झाली
रंग तवाना अंगाला
हिरव्या रंगाच्या कुपीचा
नाही तुटवडा त्याला

थोडा फिका केला तोच
गवताला फासलेला
रंग देत थंड थंड
पायी राजाही चालावा

दिनमणी उगवता
मावळतीलाही रंग
केशराचे पिंप भरे
सारा रंगांचाच संग

रंग कळतील कारे
रंग प्यारे आणि न्यारे
काही नजरेत येती
काही आतून पसारे

मोरपिसारे पिसारे
रंग फुलातून द्या रे
रंगारंग जीवनाला
रंग भरून करा रे

दि.०५/०३/२१
रात्री १०.१० वा.



(२२)
**एक आपलं आकाश**

कित्ती देखणी देखणी
इमारत महाराणी
वास्तू सुबक रेखीव
ठसठशीत आखणी

रंगसंगती नभाची
नभ भरून आलेलं
रूप न्याहाळत इथं
उतरून की आलेलं

इमारतीचा आरसा
वर आभाळाचा स्वच्छ
नभललना भाळून
रूप सावरते दक्ष

तिचे दर्पण ती वास्तू
एकमेकींचे सहारे
थोडे जलथेंब येता
येती फुलून शहारे

अशी गप्प गप्प शांत
वास्तू माणसाविनाच
जशी अबोल वधूची
घालमेल मनातच

थोडा उल्हास नि आस
थोडी कळा ती उदास
जग सारे डळमळ
एक आपलं आकाश
एक आपलं आकाश

दि.०६/०४/२१
सायं ०७.०४ वा.



## (२३)
## अशी एक सांज

अशी एक सांज
सारे रंग सोडते
सोनपिवळ्या रंगाचा
शृंगार मांडते

ते तिचे रुपास तिच्या
सोने मढविणे
रंगाला उजळवुनी ते
नभी चढविणे

थकलेल्या दिनकरास
देई निरोपा
तोही मालवून जाय
देख त्या रूपा

येई हळुवार नभी
चंद्र राजस
सजलेली सांज होय
किती तेजस

दीप पेटतील घरी
सांज बहरण्या
कुंपणे न घाला आता
मना विहरण्या

दि.०८/०४/२१
०६.२१ वा.



## (२४)
## माझा कोकण मायाळू

माझा कोकण मायाळू
बाप माय कनवाळू
त्याचं मन गरे गोड
संगे निसर्ग अजोड

माती पाणी ऊन वारा
कसा सुखाचा निवारा
विहीरीत बालपण
साऱ्या जगण्याचा थारा

असा पाऊस कोसळे
त्याची माया भारी इथं
मला भिजवून टाके
धार मुसळाची इथं

गंध मातीचा पसरे
त्यास सुवास पोफळी
आंबा महके तसाच
फणसंही गोड कळी

फुलं रानटी काटेरी
मन नाजूक तयांचे
दुःख विसरून मग
कसे हासणे तवाणे

घरं वेगवेगळाली
तरी मन एक इथे
सारे गाव एक घर
घरदार बोलणारे

कसा रमतो माणूस
माणुसकी हरीभरी
पोटापाण्यासाठी पोरं
होती चाकरमानी की

तरी गणपतीसाठी
सारी गावाकडं येती
सारा कोकण फुलतो
गोकुळाची सय व्हती

भाषा कोंकणी इथली
तिला गावरान माया
माय कोकणात ऱ्हाई
उतावीळ ती भेटाया

जरी राहतो शहरी
मन वाडीत हिंडतं
आंबा पोफळी नारळ
मनी फणस कोंडतं

शेत भाताची लगबग
दाणं ताटात पडती
त्यात तुपाची कीं धार
नदी गोरस दुभती

एकटं च बसावी कीं
जरा निवांत कुशीत
निसर्गची माय बाप
कसे येतात खुशीत

वारा झुलवी हिंदोळा
कानी बोले कीं पाचोळा
मनी पंचप्राण गोळा
असा सुरम्य सोहळा

दि.०७/१२/२०२०
दुपारी १२.३२ वा.




## (२५)
## मंद फिकटसे हास्य

घे वाचून तू धुक्याधुक्यातील
मंद फिकटसे हास्य जणू
मनात उमटून येतील रेषा
भरून येतील नंद घनू

पाने दडली गुपचूप कोठे
झाडे पुसटशी दिसती ना
रस्ता गेला बुडून कोठे
अस्तित्वे परि असती ना

घेत मागोवा जणू स्वप्नांचा
रात घुटमळे पुन्हा पुन्हा
पेंगुळलेली पहाट जागे
धूसर धुक्यात शोधू खुणा

नभ आहे की नाही वाटते
काही काही न दिसते बघ
कुशीत धरणी त्या आकाशा
घेऊन दडुनी बसते बघ

नि:श्वासातील ऊब पांघरून
सख्या बिलगशी घट्ट मला
ऐशी जवळीक करेल बंदी
बाहुकोशी प्रियवर तुजला

दि.०९/०७/२०२३
सकाळी ११.०९ वा.



## (२६)
## नभ मोकळे झालेले

आत भरून साचले
किती दिसांचे वाफारे
आधी हलके वाटती
पुन्हा जड ते झालेले

एक अवस्था आधीची
मग जलथेंब होती
ओझे मनात वाढते
चाल मंदाऊन जाती

तो तो ढग बने एक
आत गढूळ प्रकाश
वाढतंच चाललेली
गर्दी मेघांची तशात

कोणी अडवण्या येई
दुःख डोंगर विशाल
वारा उडवण्या पाही
आत हजारो शकलं

ऋतू यावा लागतो ना
ढग गाभुळण्या आले
कुणी भेटता आपुला
नभ मोकळे झालेले

दि.२२/०४/२१
दुपारी १२.२३ वा.



## (२७)
## अशी कांती तेजाळली

गेला बुडून डुबून
सायंकाळच्या प्रहरी
क्षितिजाशी रेंगाळली
केशराची छटा न्यारी

जाता जातानाही देतो
रविराज दृष्टिसुख
वर निशापती आला
भागे चांदण्याची भूक

एक तेज तळपते
एक आल्हाद लेऊन
दिन प्रकाशित करी
एक रात जागवून

एक येतो उठवत
एक झोपण्यास सांगे
दोघे चालवती रथ
सृष्टी रंगातून दंगे

एक मावळतो तरी
मनी उगवत राही
एक उगवतो जरी
शीण जाय मावळती

नभी सौभाग्याचा टिळा
केशराचा गंधमळा
निशी सजून धजून
चांद रुपेरी बावळा

जीव त्याच्यातंही आहे
जीव याच्याही भवती
जिथं तेज शीतलता
थोडं थांबू की सांगाती

राहे आदित्य ह्रदयी
चंद्र मनातून वाहे
एक दिवसाचे स्वप्नं
एक रातीस रमवे

अशी कांती तेजाळली
दिशा कशी उजळली
औक्षवण करते ही
तेज किरण अवळी

दि.२५/०४/२१
रात्री ०८.०३ वा.

## (२८)
## स्थाने काही उरात उरती

कधी कुठले हे काठ बोलके
पडले ओसाड
शैवाळाच्या थराथरातून
एक मुकी साद

जलाशयाच्या भवती आखीव
बांधीव रचना ही
कधी माणसाचीही होती
येण्याजण्याची

हिरवी हिरवी दाट झाडी ही
काठाकाठाने
रंग डोकवतो कंच हरित हा
जळात थाटाने

एक अनामिक ओढ ओढते
मजला ही शांती
कधी वाटते माहीत यांना
गतजन्म भ्रमंती

पुन्हा एकदा जळात वाकून
प्रतिबंबा पहावे
पायरीवरती टेकून थोडे
मोकळे की व्हावे

स्थाने काही उरात उरती
बंध ओळखीचे
उगाच कोणी आपुले होते
जरी अनोळखीचे

दि.१५/०५/२१
रात्री ०९.११ वा.



## (२९)
## पायवाट

जिवाभावाची पायवाट
तिचा आपुलाच एक थाट
नागमोडीची वळणं घेते
आपुलकीचे तिचे काठ

तिची हुळहुळणारी माती
पायासाठी पायघड्या घाली
चंदनाचीच पखरण जणू
कुणी वाटेवर त्या केली

पावसात ओलावा जपते
घेते शोषून जलधारांना
उन्हं रापुन जाती इथं
माती थंडावा दे साऱ्यांना

चालचालून थकवा येता
जर कडेला बुड टेकवा की
मग उठून चाला तुम्ही
संग कपड्यावर पायवाट ही

झाडाबुंध्याशी सावली खात
असा विसावा लाभतोय
पायवाट मनामध्ये ही
तिचा सुगंध रुळतोय

कधी आठवांनी अल्लड
कधी उगाच शहाणी पोक्त
कधी मस्ती बाळगोपाळी
कधी हुरहूर सायं सूक्त

कधी माहेर ला नेणारी
कधी सासर दाखवणारी
कधी रडणे हसणे रुसणे
कधी सुख हे नेसवणारी

ही पायवाट सखी माझी
ही पायवाट सुखी माझी
ही पायवाट सोबती
ही पायवाट नौबती

ती पहुडते रानीवनी
ती चालते सहजी जीवनी
ती अजून माझ्या मनी
ती आजंही संजीवनी

दि.१४/०५/२१
दुपारी १२.५१ वा.

## (३०)
## अशी कांती तेजाळली

गेला बुडून डुबून
सायंकाळच्या प्रहरी
क्षितिजाशी रेंगाळली
केशराची छटा न्यारी

जाता जातानाही देतो
रविराज दृष्टिसुख
वर निशापती आला
भागे चांदण्याची भूक

एक तेज तळपते
एक आल्हाद लेऊन
दिन प्रकाशित करी
एक रात जागवून

एक येतो उठवत
एक झोपण्यास सांगे
दोघे चालवती रथ
सृष्टी रंगातून दंगे

एक मावळतो तरी
मनी उगवत राही
एक उगवतो जरी
शीण जाय मावळती

नभी सौभाग्याचा टिळा
केशराचा गंधमळा
निशी सजून धजून
चांद रुपेरी बावळा

जीव त्याच्यातंही आहे
जीव याच्याही भवती
जिथं तेज शीतलता
थोडं थांबू कीं सांगाती

राहे आदित्य हृदयी
चंद्र मनातून वाहे
एक दिवसाचे स्वप्नं
एक रातीस रमवे

अशी कांती तेजाळली
दिशा कशी उजळली
औक्षवण करते ही
तेज किरण अवळी

दि.२५/०४/२१
रात्री ०८.०३ वा.

## (३१)
## शिकवण वैशाखाची

येतो वैशाख वैशाख
ल्येत आगीचा पोशाख
त्याचा नाच चाले खास
अंगा काहिली वनवास

चंद्र पौर्णिमेला येतो
विशाखाच्या आसपास
बहरत्या मोगरीचा
दरवळतो सुवास

सूर्य वृषभ राशीत
आग ओकतो भरात
नवं धान्य भरलेल्या
गोण्या येतील दारात

लग्नसराईची घाई
एकरूप दोन जीव
अशा काहिलीत मग
मनी वसंत सजीव

कुठे गुलमोहराला
येतो बहार बहार
रुक्ष कोरड्या हवेत
गंध अत्तरी फवार

पाणी माठातलं प्यावं
त्यात वाळयाचा सुवास
थंड पडदे घराला
उष्म्याच्या या उतारास

सरबतं पन्हे पेये
सरसर उदरात
आमराईतला आंबा
चाले रसाळी घरात

शिकवण वैशाखाची
सोस झळा दिसमास
दुःख तापलेलं आधी
मग सुखाचा प्रवास

दि.२१/०५/२१
सकाळी ०९.४७ वा.

## (३२)
## दुःख बोलके वसुंधरेचे

वसुंधरा दिन आहे म्हणुनी
बोलते काही आज
दुःख मनातील सांगू कुणाला
आहे मी नाराज

घ्या मुलांनो काळजी माझी
तिळतीळ तुटते आहे
वर्तन हिंसक मर्म छेदिता
काळीज फाटते आहे

तुम्हा पोसते अन्नजलाने
प्राणवायुही देते मी
वस्त्र निवारा शीतल छाया
ऋतू सुंदरसे आणते मी

वृक्षवल्ली मजवरची सृष्टी
केली अरण्ये नष्ट
कुरघोडी रे करता तुम्ही
खोदून करता भ्रष्ट

खणले सारे, भोके हजारो
जखमा भळभळणाऱ्या
उष्मा वाढवून हिमनग गळती
लाटा फेसाळणाऱ्या

अण्वस्त्रांनी विवस्त्र केले
बॉम्बगोळे मज भेदून गेले
विज्ञानाच्या प्रगतीमध्ये
बुद्धिभ्रष्ट तुम्ही वाहून गेले

अध्यात्माने माय मानले
कब्जा सांगे विज्ञान
ज्ञान कोणते नसते वाईट
हाव विखारी जाण

तुम्ही बागडा मुक्तपणे पण
मला हानी ना करा कधीही
आई बोलते हाक ऐका ना
मी जगले तर जगाल तुम्ही

नाते सुंदर युगायुगांचे
आईला असे छळू नका
पुन्हा कुशीतून फुलून येण्या
माया माझी कळून घ्या

दि.२३/०४/२१
सायं ०६.४६ वा.
जागतिक वसुंधरा दिनानिमित्त

## (३३)
## माय डोंगराची माया

बाप टणक डोंगर
माय झालेला पाहिला
त्याच्या अंगा खांद्यावर
खेळ कवळ्या पानांचा

डोंगर पोटुशी झालाय
अगणित बीजबाळं
येत पावसाची माया
त्याचं बाळंतपण केलं

आया झाली थोडे दिस
स्वर्गातील वर्षाराणी
तिनं न्हाऊ माखू केलं
धरलं बाळसं रोपांनी

हळू वारा मामा आला
गीत अंगाई गाण्याला
तिठ लावण्याची घाई
हळव्या डोंगर आईला

नीज कुशीत घेऊन
वारा पाणी घे पिऊन
लेकरं ही मोठी होती
घट्ट मुळं सांभाळून

पहा मानव बाळांनो
जपा पाळंमुळं तुम्ही
नका विसरू कधीच
तुम्हा वाढविले ज्यांनी

दि.१५/०६/२१
सकाळी ०९.२१ वा.



## (३४)
## या घराच्या भोवताली

या घराच्या भोवताली
स्वप्नं माझे उमलले
रंग सारे पांघरुनी ते
फूल होऊनी डोलले

ही सुखाची थंड हिरवळ
दाटली सभोताली की
आणि सौख्याची हरित
वनराई पसरून गेली जी

झुळुझुळु वाहे प्रवाह
गीत गाऊन अंगणी
कस्तुरीचा गंध वाहे
सुरभी काही चंदनी

या फुलांच्या गुल्म दाटी
रंगी रंगुन बोलती
गुज माझे एकमेकींच्या
मनी जणु सांगती

हे झरोके या घराचे
मोकळे किती मोकळे
दिलखुलास हे सांगती ना
सृष्टीनाते आगळे

हा विसावा हा दिलासा
देह मन रमते इथे
घरकुलाच्या कोंदणातून
जन्म रेंगाळे इथे

दि.३०/०१/२१
रात्री ०९.११ वा.



## (३५)
## निळी मदमस्ती

निळ्या पांघरून नभाला सखी
धरती झाली निळी श्याम सखया परी
निळ्या डोंगरांची गडदशी निळाई
मनी रत्ने नीलम पेरून जाई

अशी ही सकाळ कशी धुंद झाली
मस्तीतली रात अशी मंद झाली
जळातील प्रतिबिंब झाले निळे
मला रंग माझाच नाही कळे

जरी वनराजी हरित हिरवाई
निळी पारदर्शक पांघरून निळाई
जणू वाटते पाचू नीलमची गुंफण
इथे जाहला नील सुंदर कण कण

नीलयम सदने उंच शिखरे तयाची
खगांची विहारे निळ्या या आकाशी
निळे चांदणे निळ्या स्वप्नकोशी
निळी मदमस्ती निळी मदहोशी

ना संपो कधी  नवलाई निळ्याची
निळ्या रंगी राधा नि मीरा बुडावी
निळ्या जाहल्या भावना नीलपंखी
निळे सूर पाव्यातुनी घुमताती

दि.२०/०७/२१
सकाळी ०९.३२ वा.

## (३६)
## पाझर

झिरपणं गरजेचं
काही पाझरण्यासाठी
मुरणंही गरजेचं
झरे झरण्याच्यासाठी

वर वाटतं कठीण
परी आत मऊशार
पाषाणाला लागते की
कधी आतूनच धार

डोंगराच्या कणखर
अशा पहाडी देहात
कसा कुठून साठतो
ओलावाही खोल आत

बाप टणक कठोर
आत माया सांघाळते
लेक सासुराशी जाता
माय होत रेंगाळते

सदा पाझर फुटतो
त्यास माहेर म्हणावं
अनमोल प्रेम लाभे
त्यास आहेर म्हणावं

किती ढगांमध्ये जोर
शोर गर्जत राही
पाझराच्या सोहळ्याला
सारी सृष्टी चिंब होई

अभिषेक निरंतर
डोई पाझर झिरपे
शिव होई हो प्रसन्न
जलधारांच्या किरपे

प्रेम जिव्हाळा वात्सल्य
सारं सारं पावता रे
झिरपून चित्त लेई
पाझराची नवता रे

पाझराच्या आशेपायी
किती तहानलेली मी
तुझं काळीज कठीण
किती शिणलेली मीही

नाही फुटला कधीच
एक सानुला झराही
तू ना झाला कधी माझा
तुला मोल ना जराही

दूर कोठून मिळे का
ओलाव्याचा गंध प्यारा
एक पाझरची होई
प्रीत धागा बांधणारा

दि.१६/०७/२१
सायं ०६.५७ वा.



## (३७)
## मोती शिंपल्यातला

मोती शिंपल्यातला
चकाकून उठला
एक थेंब वर्षेचा
स्वातीवर दडला

नक्षत्री त्या जन्म चांगला
पाण्यालाही मोती लाभला
शिंपले झाले माता पिता
दोघे मिळुनी जपती त्याला

शिंपले पात्या अभिन्न होऊन
जलथेंबाला जपती स्वतः हून
बंद करून घेती दरवाजे
आत रत्न अनमोल निपजे

मोती सागरी जन्मा येतो
तरी विनम्र कायम रहातो
रत्नाकराच्या भांडारातून
शांत स्वभावे परिचित होतो

चंद्रासम उज्ज्वल कांती
परिधानाने लाभते शांती
चंद्राचे हे रत्न राजस
मौक्तिकमाला दिसती मोहक

परंपरेने मोत्या जपले
दागदागिने अती सुंदर घडले
मुकुटापासून पैंजण जोडवी
नथीमधे तर कलाकुसर घडली

मनात मोती क्षणा क्षणांचे
आनंदाचे मौक्तिकहार
असतील जपले प्रत्येकाने
होत शिंपले वारंवार

दि. २१/७/१९
रात्री १०.३९ वा.



## (३८)
## इच्छा दुर्दम्य

असता इच्छा दुर्दम्य
मार्ग निघती अगम्य
सुकली भूमी, टणक खडक
तरी रोप उगवेच कडक

वर वर दिसते रोप मृदू
इच्छा त्याची खडक खणू
पाणी कोठून आणायचे
उद्या कसे मी जगायचे

रडणे नाही, नाही कुथणे
चिंतेमध्ये उगा न डुबणे
ह्या क्षणाला, परिस्थितीला
नमवून डोके वर काढणे

बीज केवढे, केवढा जीव
नको तरीपण कुणाची कीव
हिम्मत अंगची जागवायची
धरित्रीलाही फाकवायची

कोंबासाठी ती नरमेल
रुक्ष ढेकळे दूर करेल
असेच सहजी कशी करेल
आतून धक्का द्यावा लागेल

चिडेल, ओरडेल, वैतागेल
कोंबासाठी पण ऐकेल
थोडं थोडं टणकपण
दूर सारून त्या पोसेल

आत खोल खोल कणाकणात
ओलावा जपलेला मनात
बीज देऊन अंकुरेल
रोप स्नेहाने तरतरेल

डोंगर फाडून असेच येणे
पाझर दगडा फोडून जाणे
कुठले पाणी, कसे साचले
मन त्याचेही असते ओले

बस... ओलावा तो छुपलेला
जगापासुनी जो लपलेला
आपुलकीचे बीज अंकुरण्या
वसा मायेचा वसलेला

दि.२२/७/१९
रात्री १०.५१ वा.



## (३९)
## रंगीत दुलई

गर्द निळ्या जांभळ्या फुलांची
रंगीत दुलई पांघरावी
वर्णहीन डोंगरानं देखील
हिरवी चटई अंथरावी

निळी जांभळी फुले केवढी
उत्सुक दिसती डुलण्याला
रानफुलांचा वर्णोत्सव हा
जरूर या हो पाहण्याला

आपुल्याच नादात फुले ही
नंदकुमारा आळवती
राधेच्या गालाची निळाई
अंगाला माखून घेती

घरादाराशी उमलणारी
गोकर्णाची फुले जांभळी
गोपालाच्या आठवणीत
तीही दाटसर घेती निळाई

गाईच्या कानाचा घेऊन
हुबेहूब शरीरा आकार
शिवशंभुला प्रिय होऊनी
गोकर्ण मानते जणू आभार

निसर्गास ना कधी वावडे
कोणत्याही त्या रंगाचे
फुलास तर फुलणेच आवडे
रंग ल्येत श्रीरंगाचे

हिरव्या पानांवरती दिसती
निळी जांभळी फुले डोलती
रंगांचा कुंचला हरीचा
फिरता रंगही बोलू लागती

दि.२२/७/१९
सायं ६.४६ वा.



## (४०)
## फिक्या रंगांची शोभा

फिक्या रंगांची शोभा निराळी
आकाशी नभ उतरून खाली
फुलाफुलांवर पसरून जाता
धरागगन घे नवी उमाळी

सोनपिवळे सोनेरी
सूर्यबिंब हो फूल पाकळी
सुवर्णकांती फुलराण्यांनी
साडी नेसली लिंबू पिवळी

मधे मधे ती शुभ्र पांढरी
फुले चमकती नभी चांदणी
साऱ्या रंगांमधून श्वेता
पांढुरके कोरून गोंदणी

फिकी जांभळी रंग नवाळी
आपुला तोरा गात वेगळी
तुऱ्यातुऱ्यातून डोलत राहते
नाजूक रंगांची रंगाळी

रंग केशरी ताजातवाना
आळवत राही गायनताना
फूलपाखरे येती मिचकवत
गोल गोल डोळे, पंखतराणा

फिके गुलाबी फूल ताटवे
गालावरती कुणी सांडले
अधरावरती रंग पसरूनी
लज्जेची पाकळी वाटते

मऊ मखमाली रंग पोपटी
पानापानामधुन फवारे
रंग वेगळे घेऊन संगे
झालेत रानवेडे वारे

रंगीत स्वप्ने किती दिसांची
फुललीत हाती घेऊन हात
पसरून मऊसर गालिचा इथं
नाजूक फुलं रंगभरात

दि.२३/७/१९
दुपारी १.४५ वा.



## (४१)
## गगनचुंबी वृक्षराजी

गगनचुंबी वृक्षराजी
पालवीने व्यापलेली
मार्ग धुतला नितळ झाला
वृष्टी त्यावर ओतलेली

आकाशाला गवसताना
तळ असावा स्वच्छ की
पारदर्शी मार्ग अथवा
भूमीतलही सावरी

हिरव्या हिरव्या रानी जातो
वारा कानी सांगतो
रथ कुणाचा मंद चाली
आज येथे चालतो

भूल पडते सृष्टीसाठी
गोडव्याचा सोहळा
वाट इथली सोडवेना
अन निवांत ह्या वेळा

मन जरासे बोलते ना
ते स्वत:शी डोलते ना
एकरूप होता जरासे
कळते सृष्टिमोल ना

एकट्याने जीवनाचा मार्ग
चालणे सुंदर
जगजनांच्या कोलाहली
व्यर्थ हेतू धूसर

चल पुन्हा स्वीकार पांथा
एकल्याने चालणे
ऐकशील मग तेव्हा तुही
रानसृष्टी बोलणे

दि.२३/७/१९
सकाळी ९.२६ वा.



## (४२)
## नव्या दिसाची नवी सुरुवात

नव्या दिसाची नवी सुरुवात
आयुष्यावर कर बरसात
प्रसन्न सकाळ ये झोकात
होडी तिची सुखसागरात

पहिले काम ती हे करते
आधी अरुणा पिटाळते
सूर्यरथाला सज्ज ठेवण्या
सांगून ती पुढे चालते

दिनमणी रथारूढ होऊनी
पिवळ्या केशरी झाकीमधुनी
प्राचीवरती पसरून तेज
डोकावतो आकाशामधुनी

बिंब तेजाचे ऊर्जेचे
दिसते सकाळी स्फूर्तीचे
पक्षी गवसणी घालिती नभा
पंखात रवीबळ भरण्याचे

ढगा ढगांना रंगीत वेश
किरणांचा सर्वत्र प्रवेश
आकाशाची ललना खुलते
रोज स्वत: वर स्वत:च भुलते

उषा लाजरी प्रियकर रवी
तिच्या मागावर तो सरसावी
ती पळते जरी पुढे पुढे
कवेत त्याच्या ती सापडे

सुखद सकाळ रम्य दिशा
वसन सोनेरी नेसे उषा
अलंकार तिचे कांचनपिवळे
मुखचंद्रावर नवीन आशा

अशी पहावी रोज सकाळ
हृदय कोंदणी सुरेख माळ
आयुष्याच्या भाळपट्टकीं
ईश्वरा दे नित शुभकाळ

दि.२४/७/१९
दुपारी १.५१ वा.



## (४३)
## आपण दोघी बहिणी

आपण दोघी
बहिणी बहिणी
सख्याच असतो
रोज किनई

सगळ्या गप्पा,
कधी कधी खफा
तरी हसतो ना
पानोपानी

चल चल चल
झाडाखाली बसू
नदीत उसळती
लाटा बघू

लाटेवर होडी
त्यात माणसांची जोडी
वल्हवताना
पाहू ना थोडी

आली आली आली
बघ मासोळी आली
वर तोंड काढून
पुन्हा गडप झाली

गाईही आल्यात
वासरांना घेऊन
सांजवेळी पाणी
पोटात साठवून

पक्षीही सारे
उतरले इथे
पिऊन पाणी
घरट्यात जाणे

सूर्य मावळतो
किरणं नदीत
आपली मज्जा
आपुल्या मुठीत

झाडाच्या खाली
उतरणीला
पसरून पाय
बसू संगतीला

वारा खट्याळ
मऊ केस उडवितो
उडवून माथी
पुन्हा पाडतो

गळ्यात तुझ्या
मी गुंफीले हात
डोळ्यात आनंद
आऽऽतोनात

आईची आरोळी
येण्याच्या आधी
निसर्गा सोबती
आपण दोघी

मोठ्या झाल्यावर
अशाच बसू
बालपणीचे
दिवस आठवू

ही नदी, ही झाडे
या लता न लाटा
चेहऱ्या भोवती
उडणाऱ्या बटा

ओठात मावे ना
एवढे हसू
लहानग्या
जलपऱ्या की दिसू

नजरेत साठवून
गाव हे आपले
पुन्हा नव्याने
निवांत भेटणे

दि.२३/७/१९
सायं ४.२१ वा



## (४४)
## इंद्रधनू शेतात उतरले

इंद्रधनू शेतात उतरले
झोपडीवरी रंग पसरले
आज गरीबाघरी दिवाळी
तीपण साजरी होत सकाळी

वसुंधरेचा हिरवा पिवळा
पोपटी असा शृंगार पाहण्या
इंद्रधनूला मोह जाहला
मोहित तो तिज स्पर्शून घेण्या

आकाशाशी नाते तिचे
इंद्रचापाने रेखीयले
सप्तरंग उधळून मस्तीने
तिला गुलाबी अधिकच केले

डोंगर हिरवे रानोमाळ
शेते पिकली ती अळमाळ
रंगांचा गोडवा मिसळला
रंगीत मिश्रण दिसे कमाल

श्रावणातले चित्र देखणे
स्वर्गामधला चित्रकार
रंग तयाचे कधी न संपती
रंगसोहळे वारंवार

काळ्या काळ्या जमिनीमधुनी
रंग बहरती फुलाफळातून
निळया निळ्या आकाशातून
रंगछटा जातील पसरून

इंद्रधनूची कमान जणू ती
स्वर्ग पृथ्वीचे विवाहमीलन
सूर सनईचे सृष्टी छेडते
मंगलाष्टके शेतातून

पडती अक्षता धरित्रीवरती
बीज होऊनी त्या फळती
अन्न ब्रह्माचे आशीर्वाद
क्षुधाशांतीतून मग मिळती

असे देखणे चित्र हवेसे
श्रावणराजा दाखवतो
उत्सवनांदी पृथ्वीवरती
संवत्सरभर राबवतो

दि.२४/७/१९
दुपारी १.११ वा.



## (४५)
## फुले अळुमाळू

फुले अळुमाळू
नाजूक स्वप्नाळू
रंग पाकळ्यात सारा
वारा जीव घुटमळू

वारा सावध सावध
वाहे शांत हळूहळू
कुजबुज फुलराण्या
येई धरित्रीला कळू

होई प्रसन्न फुलांचा
दिस सकाळू सकाळू
झरा बघ गाई गाणं
वाहताना झुळू झुळू

पराग पाहताती
रुजण्याला नवस्थळू
फुलपाखरं की दूत
नेती लगडून पायतळू

बीज एका भुईतलं
जातं दूर रानमाळू
तिथं आलं आलं फूल
नव्यानं फुलनाळू

--
--




## (४६)
## दिवस उजडतो चैतन्याने

दिवस उजडतो चैतन्याने
उठून ते साठवून घ्यावे
की अंथरुणात लोळत पडून
प्रकाश सोहळ्या गमवावे

भल्या पहाटे प्रसन्नतेचा
आकाशातून पडतो सडा
वेचून घेऊन शरीर मनाला
उत्साहाचा द्यावा धडा

किलबिल किलबिल चिमणी पाखरे
दैनंदिनी सुरू करती
इवल्या इवल्या कंठामधुनी
सृष्टीगीत ती गाती

नदी झुळझुळे आनंदाने
मार्ग पुढे चालते
सागरास भेटण्या अंतरा
प्रभातीस ती काटे

झाडेवेली ताज्यातवाण्या
झटकून अंगा होती
फळे फुले साऊली
देण्यास सरसावून येती

आकाशातून नानावर्ण
धरित्रीस स्पर्षती
इंद्रधनुचे रंग चांगले
रोज तिच्यावर बरसती

सृष्टी सारी जागी होऊन
कार्यास गती ती देते
आपण उठून तिला पाहता
मन उभारी घेते

झोपून नुसते स्वप्नं पाहता
कोण पुरे करणार
अंथरूनही झेलून तुम्हा
थकलेले असणार

प्रातः काळी उठून मग
स्वप्नपूर्तीसाठी धावावे
कवेत चटकन येईल तुमच्या
त्याला प्रयत्ने गाठावे

उठता सकाळी आरोग्याची
साथ लाभे उत्तम
शरीर, मन दोन्हीही प्रसन्न
प्रेरित अंतर्मन

देवांचे दिव्यत्व सापडे
आकाशातून प्रभा
रोज उठू या ब्राह्ममुहूर्ती
ज्ञान मिळविते आभा

दि.२४/७/१९
दुपारी १२.३७ वा.



(४७)
## क्षितिजावरची लालिमा

क्षितिजावरची लालिमा
सरोवरात बिंबिली
आकाशाने पहाटेला
हळूच धरणी चुंबिली

लाजली ती लाजली
क्षितिजापाशी थांबली
लाल लालेलाल गाल
पाण्यात लपवू लागली

धुऊन घेता जळामध्ये
कपोललाली उतरली
धरा अजूनच क्षितीजाच्या
कुशीत लपून बावरली

त्यातच बिंब नारायणाचे
प्राचीवरती अवतरले
निद्रेत गुंगल्या विश्वाला
प्रेम तयांचे हे कळले

अशा लाघवी प्रणयवेळा
रोज सकाळी धरणीला
निशा कुशीतून उठवत येतो
आभाळसखा बघ तरुणीला

ती बघते, उठते आपुलकीने
त्याचे स्वागत करण्याला
सृष्टी रंगते त्या दोघांच्या
रम्य गोमट्या मेलनाला

जाग जागला शुभ्र पतंग
शोधत हंसी राजहंस
तिच्या मीलना उत्सुक तो की
अशा वेळेला असीम दिगंत

झाडे जागली, पानोपानी
उत्फुल्ल तयांचे दिसती रंग
प्रतिबिंबाने दोन वाटती
सृष्टीराधा नभश्रीरंग

दि.२८/७/१९
दुपारी ३.२१ वा.




## (४८)
## डेरेदार झाडं

एका ओळीत रांगेत
डेरेदार झाडं
त्यांच्या पानांच्या पसाऱ्यातून
ऊन खाली पडं

पानं हिरवीगार लाल लाल
मिसळून एकमेकात
ऊन्ह अंगावर झेलून
आली पिवळ्या सोनेरी रंगात

पायी पसरे गालिचा
स्वप्नमार्ग मऊशार
फुलापानांच्या जाळीत
सोनचित्र चमकदार

मला भेटेल इथेच
माझ्या मनीचा देखावा
निवांत क्षण सोने
इथं आनंद लुटावा

कुठून येईल का
राजकुमार मनीचा
हळव्या राजकन्येसाठी
फुले ताटवा वनीचा

पानसळी तिचा स्पर्श
वेड्या निसर्गाचा हर्ष
पहुडला जरा इथं
वारा शांत नि निवांत

स्वर्गीय सुख वाटे
रंग आसमंती दाटे
स्थिर चित्राचे सांगणे
जणु झाले हो बोलके

दि.२८/७/१९
सकाळी११.४९ वा.



## (४९)
## रम्य वास्तू

पहा ही वास्तू रम्य होती पण
भूतकाळ उदरात गडपली
खडका फोडून रोप उगवले
उमलफुलांनी ती पालविली

इथे नांदल्या इतिहासाच्या
खळखळत्या प्रासादखुणा
युगायुगांच्या प्रतीक्षेतुनी
अश्मा उमाळे येई पुन्हा

ओसाड रुक्ष त्या दगडांमधुनी
कोंब कोवळा पोशियला
पांग फिटतसे कधी ना कधी
नवजीवन अंकुर देखीयला

दि.२८/७/१९
सकाळी११.१३ वा.



(५०)

**पावसाळी पेरणीला**

पावसाळी पेरणीला
नांगर खांद्यावर घेत
बैलजोडी हडकुळी
मुसक्या बांधून सोबत

दुष्काळाची आठवण
आताशी थोडा आला
पाऊस नेम नाही
आला म्हणत गडप झाला

तरी तयारी करावी
शेताची नांगरून
थोडे बियाणे टाकावे
धरित्रीच्या की कुशीत

तिची कूस ओलवावी
बीज डोकावे शेतात
चारा मिळो जनावरा
घास पडावा मुखात

आता चला रं गडयांनो
बिगिबिगी शिवारात
रमू नका हिरव्या चारी
आला पाऊस भरात

दि.२८/७/१९
सकाळी ११.३४ वा.




## (५१)
## दिनकर नीलांगणी

दिनकर नीलांगणी प्रभाती
नीलसागरी नौका
पाण्यावरती बिंब चकाके
त्यात हवेचा झोका

नीलमण्यांवर सुवर्णकण
हलकेच तरंगत येती
लाटांवरती सोनसळी
चांदण्या विहरत जाती

पाण्यावरती दिवे तरंगती
सूर्याने लावलेले
नीलवर्ण जलांगणी बघ
दीप असे तेवलेले

स्वर्गाचा दीप्तीमान खंड
आकाशातून पहातो
नभसागर अन सूर्यतेजाचा
मेळ अनोखा होतो

अशा क्षणाला नौकेमधून
बसून शांत तरावे
पंख लेऊनी आकांक्षेचे
खग होऊन विहरावे

सौंदर्याच्या सर्व कल्पना
इथे फिक्या पडती
नवपरिभाषा अर्था येऊन
लावण्ये झडती

तेजोगोलक सूर्य देखणा
आकाशाचा राणा
कांती प्रभेच्या लाटा उठती
त्यावर आरूढ व्हा ना

दि.२९/७/१९
सायं ५.५२ वा.




## (५२)
## चहाचे मळे

मळे हिरवेहिरवेगार चहाचे
मऊ मखमाली हरित वर्णाचे
मज रोज खुणावती ते जवळी
मज बोटांना त्यांची नवाळी

पाठीवर घेऊन करंडी
जाळी जाळीची वेत टोपली
सकाळी सकाळी खुडण्या पाने
तयार ललना कामसुगरणे

ना कंटाळा कधी या कामी
चैतन्याची डोले पालवी
हाताने तोडून पाठीवर
टाकीत गाणे ती गुणगुणी

चहाच्या मळ्यांनी असे पेटलेली
घरातील चूल कधी विझलेली
तुमची सकाळ अन संध्याकाळ
चहाने माझे जीवन प्रतिपाळ

मी चहा न खुडते, सुखपर्ण तोडते
हिरवे हिरवे घरदार वाढते
मुलेबाळेही शिकली,
घेऊन आठवण इथली

मळे असेच पिकू दे देवा
चहापानांचा सुवास यावा
माझ्या रानाला साहेबी थाट
त्याच्या दिवाणखान्यात ऐट

घराघरात सजून बसला
आता चहाच स्वागती हसला
कप भरून येता सामोरी
सारा थकवा जाताना दिसला

दि.२८/७/१९
सायं ६.११ वा.



## (५३)
## झरोका झरोका

झरोका झरोका
आरसा पारदर्शी
घर दिसे डोंगराला
धुकं बिलगे डोंगराशी

इथं वाफळला चहा
डोंगराला की तल्लफ
कुडकूड थंडीमध्ये
गरमागरम पेय उफ

कप भरला चहाने
नजरेत थंडी भरा
फुटे पाझर पाषाणा
दव गोळा भरभरा

आत गुलाब फुलदाणी
खिडकीतून डोकावे
होतो बाहेर दवात
जरा घरातून निरखणे

गवाक्ष लांबरुंद
पारदर्शी एक छंद
सारी दृष्टी जाय तेथे
सृष्टी भर्रकन बंद

सकाळ थंडीतली अशी
जवळीक साधणारी
ऋतुसवे मनातल्या
भावनांना लाभणारी

थंड थंडी, ऊब आणि
मन प्रेमाने वाफाळे
पेय अमृताचे घेता
भाव आतून उफाळे

त्यात तिचा सहवास
सांज सकाळही एक
दिस तिलाच पाहतो
रूप दिसे वेगळेच

माझे प्रतिबिंब ती
तिचे मीही होत आहे
अशा ऋतुमीलनाला
जीव बरसतो आहे

दि. २८/७/१९
दुपारी ३.५२ वा.




## (५४)
## बाग जांभळी गुलाबी

बाग जांभळी गुलाबी
आकाश हे शराबी
निळ्याशार रंगातुनी
रंग पाझरे गुलाबी

गुलबक्षी गडद रंगा
फिक्या गुलाबी पाकळ्या
मिसळुनी रंग जाता
मोहात नभही पडता

पक्ष्यास झेप घेणे
वाटे किती सुहाने
पंखास पसरूनिया
रंगास भेट देणे

नीलवर्ण नीलाक्षी
अंबरास साजेशी
धरती गुलाबी वेडी
गुलकांती घेत वक्षी

रंग रंग नसती केवळ
ते भावनांची भाषा
नीलवर्ण मेघकृष्ण
राधाही सुमनवेशा

दि.२८/७/१९
रात्री ८.१७ वा.




## (५५)
## कलश फुलांचा

कलश फुलांचा सांडो अंगणी
जीवन फुलून जावे
सात्विक पूजा होऊन मनीचे
भाव भरभरून यावे

सजावटीचे सुंदर चित्र मज
घरी रेखता यावे
त्या चित्राला रंग वेगळे
मलाच भरता यावे

भिंती भिंती फुलफुलासम
हळव्या नाजूक व्हाव्या
छतावरून तर सुखवेली ह्या
घरामधे डोकवाव्या

ब्रह्मस्थानी कलश तांब्याचा
ओसंडून की जावा
आत्ममोगरी सुवास त्याचा
ब्रह्मानंदी न्यावा

घर फुलांचे दार फुलांचे
माणूस हळवा व्हावा
पाषाणासम कठोरभाव
त्याने मग टाळावा

क्षणा क्षणाचे जीवन असू दे
प्रफुल्ल ताजेतवाने
कशास दीर्घायुष्य असावे
कोमेजून ते जाणे

फुलफुलातून मला हसू दे
पाकळीतुनी वसू दे
अंतर्भागी गंध राहू दे
सुगन्ध मज होऊ दे

दि.२९/७/१९
रात्री ७.४९ वा.



## (५६)
## तुझं माझं घरटं

तुझं नि माझं घरटं असावं
सरोवराकाठी
झाडं झुडपं हिरवळ तेथे
गवतफुलांची दाटी
बाग बगीचा भवती असेल
घरास शोभे फार
दारावरती जाई कमान
वाके हळुवार
गुलाब जाई जुई शेवंती
रातराणी, मोगरा
फुलला सुगंध पसरत जाईल
बघ घरादारा
चहू बाजूनी गवाक्ष असतील
भवताल पाहण्याला
रामप्रहरी वृक्षांचे येईल
खगगायन ऐकण्याला
किलबिल चिवचिव मधुर गायनी
पक्षी निवांत रमतील
दाणा पाणी चोचीत भरण्या
स्वच्छंदी उडतील
एक बंगई टांगू अंगणी
दोघा झुलण्याला
झुलता झुलता पाहीन तुजला
शब्द न बोलण्याला
पाण्यामध्ये सरोवराच्या
पाय सोडुनी बसू या
शीतल स्पर्शी शांत जलाच्या
रुसवे ते विसरू या
इथे सारखा सोबत करील
निसर्ग जवळीकतेने
कधी न वाटते मजला एकटे
त्या पाहत आपुलकीने
रोज रोज हे रम्य दृश्य बघ
शर्वरी घे पोटी
निद्रासुखाने पहाट येते
गुणगुणत ओठी
घरकुल आपुले इथे विसावे
नात्याला स्थिरता
कंटाळा ना कधीच येईल
उत्साह संचारता
कधी अतिथी रमतील येथे
कौतुक करण्याला
घर असावे स्वप्नामधले
सांगतील सर्वांना

दि.३०/७/१९
सकाळी ६.५१ वा.



# (५७)
## पाऊस यावा म्हणून

पाऊस यावा यावा म्हणून
चातकासारखी वाट पाहणारे
आता तो जावा, थांबावा
म्हणून धावा करीत आहेत

तो मात्र झोडपून काढतोय
रागीट सनकी माथेफिरूसारखा
जमेल तेवढा बरसून घेतोय
कशाचीही पर्वा न करता

नद्या दुथडी भरून वाहू लागल्यात
संगती माणसं, जनावरांना नेऊ लागल्यात
घरं दारं पाण्याखाली बुडलीयत
नालेसुद्धा माणसांना नडलीयत

विशाल वृक्ष म्हणून
ज्यांचा आधार वाटायचा
तेच आज उन्मळून पडलेत
मुळासगट, पाण्याच्या जोरात

धरणं कोरडीठाक होती
आभाळाकडे बघत झुरणारी
आज पावसाळ्याच्या चारंच झडीत
भरून बेहाल झालीत
उतरणीवरच्या वाडीत

गरिबांचे हाल काय सांगावेत
झोपडी पाण्यात तरंगत असताना
लेकरं अंगा खांद्यावर घेऊन
बखोटीला गाठोडं बांधून
निवारा शोधतायत

घरं दारं असलेले सतत बातम्या
ऐकत हळहळ व्यक्त करतायत
आपापले सगळे सुखरूप आहेत
ना म्हणून प्रार्थना पूर्वक
विचारपूस करतायत

झाडं वेली दमून गेल्यात
पावसाला झेलून झेलून
अगदी माना टाकल्यात
त्राण गेल्यागत हलून हलून

रोजचं हातावर पोट असणारे
हवालदिल झालेत बाबा
उपाशी तरी किती रहायचं
नुसतीच खाऊन घेत हवा

थांब बाबा वरुण राजा
काहिली काहिली झालीय
थोडी विश्रांती घे तुही
धरणी पाणी पाणी झालीय

अश्रू तिचे बांध फोडतायत
बुडून सारे जीव सोडतायत
उरलेले जीव मुठीत घेऊन
फक्त आभाळाकडं पाहतायत

प्रलय इतका आणू नको
अजून फुलू दे पृथ्वीला
पाहिजे तेवढं कधीच दिलंस
आता उसंत दे तिला

तू घरादारात नाकातोंडात
असा बळेच शिरू नकोस
जगण्याला भिववीत
रुद्र तांडव करू नकोस

हात जोडतोय तुझ्यापुढं
आवर तुझ्या धारांना
इतकं रागावून मारतं का रे
कुणी आपल्या लेकरांना

पाणी अजून वाढेल म्हणून
अश्रूही समंजस झालेत
आतल्या आत वाहून
ते सुकूनही गेलेत

दि.४/८/१९
सकाळी ८.२९ वा



## (५८)
## डोंगर खोदून वळणवाट

डोंगर खोदून वळणवाट
अवघड चढाचा असतो घाट

खोदणे सोपे ना बांधणे सोपे
वाटेवरून त्या जाणे ना सोपे

श्रम घेतले डोंगर फुटले
कडेकडेने मार्गही सुटले

पाषाण पोटी वाट गोमटी
मुठीत जीव न चाला पुढती

तरी वाटते घाटात जावे
वाहन आपुले पुढे काढावे

जाता जाता त्या भव्यतेला
हात जोडून प्रणाम केला

समोर प्रभाती सूर्याचे बिंब
पावसाळी मन इथेच चिंब

शीतल ऋतूत धुके पांघरून
डोंगरवाटा गडप होऊन

रोपरोपटी पाहती वाकून
आलंय कोण चाले जपून

खाली दरी बघ ती खोल खोल
फिरते नजर, पडते भूल

उंची दिसते पर्वत पाहता
दरी सांगे खाईमध्ये खोलता

दोन्हीही रूपे जीवनाची ही
सुखाचे डोंगर दु:खाची खाई

सुखा पोखरून वाट काढावी अन्
दु:खाची खाई सुंदर वाटावी

असा प्रवास राहो स्मरणी
जगून घ्यावे चिंता न मरणी

दि. ३०/७/१९
सकाळी ७.५८ वा.



## (५९)
## उंच उंच वनराजी

उंच उंच वनराजी हिरवी
तिने हिरवे पाचू पांघरणे
आनंदाने डोलत असता
कडे कपारी गोंजरणे

नयनरम्य दिसतसे परिसर
स्वच्छ तयातून रस्ता सुंदर
निर्जन स्थानी, मनही शांत
सोबत तू मज असता निवांत

चल चालूया घेऊन हाती
हात परस्पर मित्रत्वाचे
जगणे दुसरे काय असावे
संगत नाते अतूटतेचे

आतुरता झाडांना कळते
तेही मनाला समजून घेती
खांद्यावरती टेकव डोके
ते पंखा वाऱ्याचा धरती

ते साक्षी असतात खरे गं
वाणी आपुली नसे तयांना
ऋतुराजाला घेऊन संगी
ते रमवती बघ आपुल्या प्रियेला

वरून धुक्याला पांघरून वधू
वनराजाची सजली धजली
तू मी लहान, तरी भाव जाणते
मनात माझी तू सांगिनी रुजली

असेच राहो प्रेम आपुले
मैत्री त्याचा धागा असू दे
आज इथे चालतो पाऊले
भविष्यात हे चित्र दिसू दे

दि.२९/७/१९
सायं ६.२३ वा.



## (६०)
## जरी असलो मी काटेरी

जरी असलो मी काटेरी
थोडासा बघ पानेरी
झुडूप म्हणू दे कोणी किती
मजला नसते काही भिती

मी खुशीत असतो मस्त मौला
खडकात झुलतोय माझा झुला
पाणी नसले तरी पहा ना
काटा माझा असतो ओला

ना पानांना काटे बोचती
ना काट्यांना दुःख बोचते
झुडुपदेही दुःख गुडूऽऽऽऽप
ऊनच सावली होते गुपचूप

सूऽऽखच सुख मानले तर
खडकापोटी असे निर्झर
मत बनविता वरचेवर
टाका वेगळी एऽऽक नजर

शांत निवांत स्थळ निर्जन
ओसाड वाटे प्रस्तरकण
तरीही उगवतो मी नूतन
डोंगरकुशीत येऽऽते वन

सुख असे शोधायचे असते
काट्यासंगे जगायचे असते
नशिबी आली जितकी हिरवळ
उजळ माथी मिरवायची असते

खडकाचा आधार घेऊनी
खोल जावे त्या अंतःकरणी
ओलावा बघ तिथे सापडे
झुडुपाचेही गोड रोपडे

मी उगवता, डोंगर हसतो
मजसी जवळ घेऊन बसतो
कष्ट उपसले, किती सोसले
तो माझ्या पानातून गवसतो

दि. ८/८/१९
रात्री १०.१३ वा.



## (६१)
## झाडायेलींच्या हिरवाईत

झाडायेलींच्या हिरवाईत
सुर्व्या करतोया पाठलाग
त्याची उषा गेली कुटं
आला शोधायला लगोलग

झाली जागी कवाच पाखरं
करती भजन रामाच्या पारी
सुख घेऊन आलिया
उषा घरात आन दारी

व्हती पावसाची रात
भिजून गेलीया धरणी
तिला सुखविण्या आली
वर्षेसंगत उषाराणी

उन्हं पांघरून शेतं
आज झालीत सोन्याची
कोकिळाला आली हुक्की
रागदारी ती गाण्याची

रानफुलांचा गंध रानी
जाईसंग मोगरा अंगणी
भरला सुवास मनातुनी
उषा हितं सुर्व्या मागुनी

देखणं जोडपं पहायचं
खुशीत साऱ्यांनी न्हायचं
सकाळी सकाळी ताजंतवानं
होऊन किरणा लेवायचं

दि.४/८/१९
सकाळी८.५४ वा.



## (६२)
## जळकोंडातून जळ निर्मळ

कोंडी फुटुनी
वाहू लागले
जळकोंडातून
जळ निर्मळ

वनराईच्यामध्ये डोले
खळखळ अवखळ
डोह खोडकर
असे नितळ कुंड

पाऊस वेडा
होऊन वाहे
झरे निर्झरे
धबधबे बंड

हिरवाई ही
कौतुक करते
वर्षाकाठी येता
जीवन

बाळगोपाळे
मारिती उड्या
जळात भरत्या
संजीवन

मनसोक्त डुंबती
डोह खिदळती
हसरी पाने फुले
त्यातून श्रावण सारा डुले

दि.२/८/१९
सकाळी ९.०३ वा.



## (६३)
## सत्त्वभाव चांगला

शुभ्र श्वेत रंग कसा
धवल, ढवळ, पांढरा
निर्मळ निष्कलंकही
सत्त्वभाव चांगला

उगम साऱ्या रंगांचा
रंग छुपे अंतरा
एक रंग दृश्यमान
शांत असा पांढरा

शांतीचे प्रतीक खगाचे
शुभ्र श्वेत कबुतरी
संदेशास धवल घेत
उडतो उंच अंबरी

अंबरात मेघ शुभ्र
कापसाचे पिंजले
त्यांस देखता नयन
गीत मनी गुंजले

शुभ्र फुले वेलीवरी
झाडे त्यात हासती
दंतकळ्या वृक्ष कसे
दाखवीत नाचती

फेसळत्या धबधब्यात
रंग तोच सांडतो
हिरवाईच्या नजाऱ्यात
मोद मनी मांडतो

गाय वासरू धवल
गोड रूप भासते
दुग्धगंगा शुभ्रपणे
जगताशी पोसते

जळ निर्मळ खळखळते
शुभ्र धार वाहवीत
जीवनास स्वच्छ करी
श्वेतवर्णी नाहवीत

साहित्यशारदेचे हासू
श्वेतवर्णी विलसते
हास्यरंग शुभ्र हाच
कवीविश्व मानते

वसन तिचे वाहनही
हंस शुभ्र होतसे
ज्ञान ध्यान जगती या
कांती लख्ख तेजसे

त्रिगुणातील सत्त्वगुण
श्वेत रंग पांघरे
वृत्ती उजळून जाय
सात्त्विक मन मंदिरे

दि.२५/८/१९
सकाळी ७.२९ वा.



## (६४)
## इतिहासाचे भव्य पुरावे

इतिहासाचे भव्य पुरावे
अवशेषाने बांधावे
भगदाडातुन पुन्हा दुव्याने
काळप्रासादे सांधावे

इथली दारे, इथल्या कमानी
वावर तिथला सांगून जाती
क्षणात मजला त्यावेळी त्या
काळी त्या स्थळीही नेती

हत्ती घोडे गाड्या इथूनच
आल्या गेल्या असतील कितीदा
जयजयकारे दुमल्या असतील
भिंतीमधल्या शिळा सर्वदा

खलबत, चर्चा, मंथन, निर्णय
कानावरती पडले असतील
जयविजय ते पाहून इथले
शौर्यचौघडे झडले असतील

उंच उंच उन्नत प्रासादे
भंगूनही त्या कथा सांगती
खुण कोणती इथे राहिली
क्षण सोनेरी इथे रेंगती

राजा राणी संसारगाणी
माती सारे जिरवून बसली
वर्तमान हिंडतो पाहण्या
भूतकाळ ती हरवून बसली

भविष्य इथले उरात घेऊन
भग्न इमारत अंकुरताहे
आनंदाला कोंब फुटूनिया
प्रासाद पुन्हा तो साकारताहे

दि.२०/८/१९
दुपारी ४.३३ वा.



## (६५)
## हास्य मुखीचे

काय सांगते हास्य मुखीचे
संकट कसले जीव बुडीचे
आकंठ बुडाला जीव जळातुन
साधन नेई तरी प्रलयातून

पूर भयंकर नाशक ठरतो
इच्छाशक्ती पुढती हरतो
वय कललेले दुःखी न झाले
जगण्यासाठी यंत्र झेलले

तरी चेहरा आनंदाला
लेऊन महापुरातून गेला
संकट मोठे अचंबित झाले
वृद्ध हास्याने ते गडबडले

शक्य कसे हे असले होणे
महासंकटी केवळ हसणे
दुःखाच्या लाटांवर बसुनी
आनंदाने खुशीत जगणे

यमुनेला पूर आला होता
अष्टमी रात्री काळोख होता
वसुदेवाने बालकृष्णाला
नंदगोकुळी नेला होता

डोक्यावरती कृष्ण टोपली
पाय लागता यमुना बोलली
प्रवाह माझा सार्थ जाहला
बाळरूपाने स्पर्श जो केला

भगवंताची सेवा करते
आज मी जरा हळू वाहते
वसुदेवाचे जीवन कृष्ण
त्या वाचवण्या काहूर प्रश्न

जगजेठी आला वाचवण्या
भक्त तारण्या धर्म रक्षिण्या
आज पुन्हा युगयुगे उलटता
वसुदेवा प्रलयाने गाठता

जीवन यंत्र जगण्यासाठी
हसुनी जातो प्रलयातुनी
तारक यंत्र मारक पाणी
मात देतसे यंत्रपाणी

हास्य अमूल्य अनन्य ऐसे
जगण्याचे ते पुस्तक जैसे
संकट येता ना हरण्याचे
हसुनी मार्गी वावरण्याचे

दि.१०/८/१९
सकाळी ९.०१ वा.



## (६६)
## रम्य सुंदराचे भास

आभाळाची छाया अशी
शिरावर राहो
आरसा हा धरणीचा
नितळ नितळ आहो

जळी त्याचे प्रतिबिंब
मोहक वाटावे
अंधाराचे जाळे बघा
क्षणात फिटावे

काय काय उदरी त्याच्या
ब्रह्मांड सारे
चमचमत्या चांदण्या नि
ग्रह गोल तारे

मार्ग व्योम होत जाय
धरा स्वर्गाचा
पथिक खग येती उडत
ठाव मर्माचा

रंग किती सुंदरसे
छटांचे आंगण
केशरी, निळ्या, राजस
रंगांचे ते रिंगण

इंद्रधनू उमटते
जरासे लाजून
प्रेयसीस पाहते की
असे वाकून

उंच उंच शिखरे जाती
चुंबीण्यास त्याला
रम्य निसर्गाचं देणं
लाभलं आभाळाला

कृष्णमेघ दाटतात
जळ भरले जेव्हा
वर्षावाने सुखावते
धरणीमाय तेव्हा

मेघकांता विद्युलता
चमकते मधेच
आकाशात तेजरेख
लखलखते एक

सूर्य उगवतो नि
तेज पसरतो प्रकाश
गर्भात रात्रीच्याही तेथे
चंद्र देई साथ

रात्र पौणिमेची रसिक
वेडावून जाई
प्रियतमेच्या केसातून
चांद जाईजुई

चातक, चकोर सारे
नभा पाहताती
अर्घ्य कोणी इथून त्याला
श्रद्धे वाहताती

कोपावता मार्तंड तो
ताप झाकविण्या
मेघा आणून नभ
धरती दिलासण्या

प्रियजन सोडून जात
आकाशी चांदणी
आठवांनी अश्रू गळती
हृदय गोंदणी

आभाळ भरून येई कधी
झाकोळते सृष्टी
कधी नभा पाहताच
ओलावते दृष्टी

बाप आभाळचि होई
माय धरणी
विशाल हे मन करावे
स्वच्छ करणी

गगनाला साद दे
आकाश ठेंगणे
अनंत ईश्वराचे
तेची रूप सांगणे

कृष्ण सावळा नभात
पाहतात जे
आकाशगंगा त्यात
मुक्त वाहतात रे

क्षितिजावर मीलन
धरतीसवे कधी
रम्य सुंदराचे भास
तत्त्व अनादी

दि.२६/८/१९
सकाळी १०.११ वा.



## (६७)
## प्रचंड लाटा

प्रचंड लाटा हुंकारणाऱ्या
विनाशतारा झंकारणाऱ्या
सारे सारे नेती विलया
घेऊन येती कवेत प्रलया

कुठे जीव जलमय होई
कुठे कोरडीठाक भुई
पाण्यासाठी जीव कोरडा
पोचेल का बघ शुष्क ओरडा

चातक वाट पाहत राही
जलथेंबाला मुखात घेई
किती माणसे चातक झाली
आ वासून बघ गगनी गेली

धारा यावी मेघमायेने
पाणी मिळावे प्रेमभराने
नको अधिकचे महापुराचे
अथवा कोरडे दुष्काळाचे

सागर राहो सीमेमध्ये
सुखी किनारे सुखी जीविते
रुद्र भयानक अवताराचे
दर्शन नकोच समुंदराचे

सुख दुःखाचे प्रसंग येती
पारखण्याला नातीगोती
निसर्ग व्हावा खरा सोबती
मग जगण्याचे रंग संगती

दि.१०/८/१९
सकाळी ८.३६ वा.



## (६८)
## कमाल निसर्गाची

कमाल निसर्गाची खरी
पदोपदी वाटते
रंग रूप आकाराने
पान फूल जागते

असेच एक पुष्प असे
लालबुंद रंगपाती
पेटत्या अग्निकुंडी
अग्निशिखा धगधगती

पीतवर्ण संगतीला
अग्नी हुबेहूब की
वाऱ्यावरी हलणाऱ्या
शिखांची ही पाकळी

नाम कुणी दिले असे
अग्निशिखा रोपटे
हिरव्या हिरव्या पानातून
शीत अनल गोमटे

श्रावणात यज्ञयाग
मंत्र जागोजागी
अग्निशिखा फुलून येत
स्वीकारी आहुती

निसर्गाने पेटविले
हरित यज्ञकुंड
अग्निशिखा फुले येती
वर्षा होता ती उदंड

दि.२६/८/१९
दुपारी १२.१७ वा.



## (६९)
## अवघा पिंपळवृक्ष उभा

आठवणींचा पिंपळ
बहरुन येतो वेळी अवेळी
मोठासा हा वृक्ष
लगडून उन्हं सोनसळी

नाजूक पालवीला
कोवळीशी धार
रेघांचं भाकीत
स्मृती हिरव्यागार

रंग हिरवाच
कसा म्हणावा
लालसर केशरी पांढुरक्या
पोपटीशार गोष्टी कळाव्या

हिंदोळ्यावर सुखाच्या
वारा अलगद झुलवत राही
पिंपळपानही डुलत हलत
आनंदाने सळसळत जाई

गळण्याची भीती नाही
सुकण्याचे नाही भय
डौलाने झाडावर
विसावण्याची केवढी सोय

झाडंही कुशीत घेऊन
अगणित पानांना
जपून ठेवत राहतंच ना
हव्या हव्याशा क्षणांना

हे बहराचे रंग
हळू हळू गडदताना
कळतंय कुठं पिंपळपाना
अवघे काळीज निसटताना

भरररकन ऋतूंचे
चक्र वेडे संपून जाते
शिशिराची शिरशिरी
पर्णालंकार लयास नेते

डोळ्यादेखत साऱ्या गोष्टी
आठवणींच्या पिंपळकोष्टी
गळून पायाशी पडतात तेव्हा
जरठ पिवळा रंग होतो नकोसा

कोणीतरी पिंपळपान
हळुवार घेऊन
हृदयाच्या ग्रंथीमध्ये
ठेवतं पहा कित्ती जपून

ऋतू सरतात
पानं गळतात
आठवांची सरबत्ती
झाडास बोडखे
करून ठेवतात

एक पान असतं कोशात
धुंद आपल्याच मदहोशात
वरचं आवरण सोडून जातं
पण आठवणींचं जाळं उरतं

केवढं सुंदर दिसतं हे
आठवांचं जाळं कोरीव
पुन्हा पुन्हा मनास अडकवीत
खुणा ठेवतं जपून भरीव

हृदयाशी हीच जाळी
क्षणभर बिलगून जाते जेव्हा
साऱ्या साऱ्या आठवांचा
अवघा पिंपळवृक्ष उभा

दि.१७/९/१९
सकाळी ६.४३ वा.



## (७०)
## मयूरबन

मयूरबन हे किती देखणे
निवांत वावर दाणे टिपणे
निळी निळाई हिरवाईसंग
आकाशाला उतरू वाटणे

मोरपिसांची दुलई ओढून
जरा पहुडली धरा निवांतून
अशी शाटिका नेसून घ्यावी
मोरपिसांनीं सजवून जावी

निर्जन निवांत रम्य वनातून
थवा तयांचा मुक्त बागडे
अजूनही ना उलगडू शकले
रंगसंगतीचे हे कोडे

मोर मयूरी नाचून दंग
पाऊस येता सृष्टीसंग
रूप देखणे पक्षीराज
डोक्यावरती तुऱ्याचा साज

फुले पिसारा आनंदाचा
डोलत डोलत मोर वावरे
शारदा करी वीणावादन
मोर सारखे तिथे पहावे

याच पिसांची होत लेखणी
ग्रंथसंपदा लिहिली जाते
केकारव तो वनात गुंजत
वनदेवी ही गायन करते

चित्र उमटते मनात कायम
चित्रकारही भाळून जाई
रंग जमवण्या कष्ट घेऊनी
स्पर्श मल्मली नजरेतून पाही

गळून जाती विकार सारे
शांतभावना विकसित होते
तपोवनाचे पावित्र्यही मग
हळूच नयनी विलसत जाते

मोर नाचू दे मनी सदोदित
आनंदाचे मेघ पाहू दे
वृष्टी मोदाची झेलून अंगी
जीवन मयूरबनची होऊ दे

दि.२६/८/१९
सकाळी ११.५४ वा.



**(७१)**
**राधा योगिनी**

रंग सावळा
जरठ पानांचा
नवी पालवी
हरितकोवळी

कुठे लालसर
कुठे श्वेतसर
कुठे गुलाबी
पान शराबी

केशर अंगी
पोपट रंगी
अबोली डोले
रंग खुमार

रंग रंगले
पर्ण कोवळे
रम्य सृष्टीचे
रंग सोहळे

झाड दामोदर
राधा पाने
नसानसातून
कृष्ण वाहणे

प्रत्येकीचा
रंग आगळा
राधा रंगीत
कृष्ण सावळा

रासरंगाचा
तो आधार
रंगे गोपिका
अपरंपार

खुले गोपिका
तशी राधिका
प्रत्येकीला
श्याम भेटतो

रंगून गेल्या
गुंगून गेल्या
श्रीरंगाच्या
मनी सावल्या

रासक्रीडेची
अशी मोहिनी
निसर्ग मोहन
राधा योगिनी

दि.२८/८/१९
सकाळी ११.४४ वा.



## (७२)
## झुंजुमुंजु पहाटंला

झुंजुमुंजु पहाटंला
सुर्व्या डोंगराच्या आड
सोनं उधळंत येई
रोज नवीन आल्याड

झाडं येली तरारती
परकाशात न्हातीधुती
उषा येताच दाराशी
आशा कोंबवून जाती

रामाच्या पारी जावं
शेतामंदी बिगिबिगी
ढवळ्या पवळ्याची जोडी
वाट खिल्लारी तुडवी

वाट रोजचीच परी
रोज नवी भासतीया
माझ्या स्वागताला ती
सजुनीया बसतीया

पानाफुलांशी बोलत
एक सकाळ होतीया
गवताची पाती बगा
कानी काही सांगतीया

दौडत शेता जातो
तिथं राब राबतोया
माझी लक्ष्मी शेताची
भरभरून देतीया

रोज धनवान होतो
म्या तर तेजाळून जातो
आरोग्याची लयलूट
पहाटंला जी करतो

दि.१६/९/१९
सकाळी ६.११ वा.



## (७३)
## घर माझे स्वप्नीचे

घर माझे स्वप्नीचे
हिरव्या डोंगराईत
सृष्टीच्या पाचूने
सजलेल्या वनराईत

सरोवराच्या काठी रम्यशा
डोंगर पायथ्याशी
साधी झोपडी ही
प्रासादा लाजवी की

छत उतरते
पावसाला हळूच सारणारे
बागबगीचा पुष्पवाडी
मना रिझवणारे

मार्ग छोटा, सेतू ऐसा
घरी येईल की नागमोडी
या घराला स्वर्ग जैसी
शांत समृद्ध मधुरगोडी

क्षण निवांत बसता थोडे
हितगुज ऐके मन माझे
जे मनी ते, तेच ध्यानी
चित्ती प्रगटे चित्र त्याचे

या घराला आपुलकीचा
गन्ध येईल वेगळा
मी इथे, ऋतुगंध लेऊन
बहर करते साजरा

रे घरा, रे घरा, घरा
केवढा तव आसरा
जीवनाचे गुज तुजला
कानी सांगते मैतरा

जपशील तू खाणाखुणा
माझ्या इह जगतातल्या
तुज सोडणे नचि लागू दे
पापण्या बघ चिंब ओल्या

दि.१३/९/१९
सायं ७.०३ वा.

## (७४)
## **गिरिराज सुंदर**

गिरिराज सुंदर
कुणी म्हणती डोंगर
पृथ्वीची गोपुरे ही
जणू टेकतात अंबर

गिरिकंदरे पवित्र
ऋषीमुनी तपाचे सूत्र
कधी चालते अखंडित
साधना तिथे सर्वत्र

कधी वस्ती असते यावर
वनवासी सज्जनांची
कधी कंटाळून जगता
आलेल्या त्या जनांची

औषधी वनस्पतींची
किती रेलचेल येथे
ते जाणकार जाणो
संजीवनीही तेथे

वैशिष्ट्यपूर्ण वनचर
फिरती इथे निरंतर
घनदाट कधी हे कानन
हिरवी दुलई पांघर

जपतात संस्कृतीला
गिरिवर सदा धुरंदर
या धरतीवरती राजे
रक्षक असे पुरंदर

दि.०३/०८/२१
सकाळी ०८.२६ वा.



## (७५)
## हिरव्या गवत पात्या

हिरव्या हिरव्या
गवत पात्या
दव पडताच
खुलती लवलवत्या

डोकावती मधूनच
रानफुले वेडी
गवताच्या सोहळ्याला
रंगारंग जोडी

कुठूनसा वेगळा
वेल डोके काढी
आपुल्या त्या पानांनी
धरणीला साडी

गुण्यागोविंदाने
उगवती सारे
श्रावणात फुलूनिया
फेर धरतारे

गाणी आनंदाची तुम्ही
दिसभर गाता
माणसाला वेगळाच
झुला झुलवता

हिरवी हिरवाई
डोळ्यास नवलाई
जवळून जाता
ताजी ताजी पर्वाई

दि.२१/९/१९
सकाळी ९.२७ वा.



## (७६)
## फुलांचे किती प्रकार

फुलांचे किती प्रकार प्रकार
निर्मिण्याचा सुविचार
गोंडस हळुवार
भावनांचा आविष्कार

पाकळीचे स्पर्श ऐसे
मल्मलीचे ते गालिचे
गाली रूळते कधी ते
पुष्प पुष्पा भाळलेले

वनी ताटवे ताटवे
उद्याने फुललेली
घरी कुंडीतून कुठे
फुलं वेडी हासलेली

काही फुलांशी हे नाते
वेगळेच जडलेले
जड हृदयात त्यांनी
खेळ गोड मांडलेले

कळी होते हळू फूल
एक सुवास अबोल
उमलता भाववेडे
लाजणारे ते कपोल

दव सजतील कधी
पाकळीच्या अंगावर
माळ मोत्यांची लेवून
तिचे रूप खुलणार

वाट पाहत राहते
फूल वेडे रसिकाची
ज्यास कोमलता ठावे
कला फुला जाणण्याची

दि १८/९/१९
सकाळी ६.४१ वा.



## (७७)
## **स्वच्छ सोनेरी उन्हानं**

स्वच्छ सोनेरी उन्हानं
न्हाऊ माखू घातलेलं
सारं रोजचंच परि
लिपी सोन्याची झालेलं

उजळून गेलं सारं
साऱ्या दिशा सोनाळल्या
थंडी भरल्या सकाळी
ऊब पांघरून गेल्या

जरा हुडहुडी व्हती
आता तजेला आलेला
सोनं देत दिवाकर
सौता सोन्यात न्हालेला

पंख सोनेरी सोनेरी
निज आकाशी उडाली
डंख बोचलेल्या राती
ऊन्हं पांघरून गेली

एक सोन्याची ही तार
आत झिरपून आली
माझ्या सपनात येडी
आपुन बी चिंब वली

आत सोनेरी परकाश
सोनउन्हं ही बाहेरी
एक सुर्व्या आकाशी
एक आतून विकाशी

दि.१२/०८/२१
सकाळी ०८.१९ वा.



## (७८)
## मन उघडते दार कोंडले

शेतामध्ये उतरून आल्या
नभास काही विचार
विहंगमाच्या नजरेने त्या
बरसव प्रीती धार

प्रियतम धरेस घेऊन समजून
उत्सव हो हिरवाई
वय कधी वाढते न यांचे
तरुण ही तरुणाई

पदतळी होतो मऊ स्पर्श हा
चालणे रेशीम वाट
अंगावरती फुले शहारा
ऋतुराणीची साथ

झुलती झाडे पाने ताजी
फुलते गवतपाती
मनामनाच्या भुईवर रेशीम
मांडून जाते नाती

दवादवांच्या शब्दांमधले
मोती कविता होती
रोज वेगळे ग्रंथ निराळे
वाचून घेता येती

मन उघडते दार कोंडले
हवा मोकळी वाहते
तीच मी तरी नव्या झुळुकेने
नवे झरोके पाहते

दि.२८/०९/२१
दुपारी ०१.१३ वा.



## (७९)
## प्रीत उधाण उराशी

उधाणलेला सागर वेडा
आसुसलेला किनारा
धुंदीमध्ये उडती लाटा
तुफान पागल वारा

उडवीत जातो तो शिखरांना
झाडे कवेत घेतो
पवन कधीचे सूर कुणाचे
दबलेले जणु गातो

झाडेवेली झोकून देती
सुसाट वेगावरती
उंच शरीरे झुलता त्यांची
शहारलेली माती

हळूच जातो पाण्यावरती
लाटेशी हिंदळतो
वायू वादळ होता होता
सूं सूं  करुनी खिदळतो

लाटही येते मस्तीमध्ये
तुफान वाऱ्यासंगे
आणि किनारा तिज सामावीत
जातो मागे मागे

चिंब होऊनी पुन्हा तियेला
अंगावरती घेतो
आज किनारा प्रियलाटेला
अगणित चुंबून घेतो

झुडुप कोवळे माना वळवून
मीलन साक्षी होती
एक अनामिक हिरवाई ते
पांघरून बघ घेती

भाण विसरुनी निसर्ग रमतो
जणू स्वर्ग दाराशी
कोण सुदैवी प्रियतम ठरतो
प्रीत उधाण उराशी

टिपून घ्यावे कुणी ओठांना
कुणी निसटत्या क्षणांना
कुणी टिपावे नयन मिटावे
हळव्या मस्त मनांना

दि.०३/०९/२१
सायं ०५.३७ वा.

## (८०)
## ओजसाचा धरू कर

ओज ओजस नभाचे, ओज तेज ते लेऊन
व्हते पोटूशी धरणी, ओजमाया पांघरून

जीव जीवांचे कारण, सस्य बीज तिच्या ओटी
रूप गर्भार माय, कित्ती दिसते गोमटी

ओज दिसामासी वाढे, अगा ब्रह्मान्डा एवढे
आत इवले रुपडे, मधुमधुर केवढे

आकारून साकारून, पेशी पेशी ओजावली
अणुरेणू सांधुनिया, कुडी कशी तेजावली

ब्रह्म ओजसाचा धागा, मूळ स्रोत होय जागा
कण कण ओजसाचा, जिवा अहंभाव उगा

ओजसाचेच जोंधळे, पीठ ओजस सांडते
चूल मांडून विश्वाची, आदिमाया की रांधते

तिची भाकर ही गोल, सारे ग्रह तारे गोल
गोल फिरते धरणी, फेर चौऱ्यांशीचा गोल

नको फिरण्याची भूल, चूल सावरू सकळ
ओजसाचा धरू कर, शांती ओजात नितळ

दि.२५/१०/२१
दुपारी ०२.२४ वा.



## (८१)
## पहाट ओली दवात न्हाली

पहाट ओली दवात न्हाली
थंडी गुलाबी आली
शृंगाराच्या मधुर महाली
वर्दी हुडहुडी गेली

झोप जाहली साखर गोडी
ऊब हवीहवीशी
कुणी उतरली अप्सरा जणू
झगा धुक्याचा ल्याली

सगळे दिसते पुसट पुसटसे
प्रीत स्पष्ट बघ झाली
मिठीत येते नाविन्याची
सुरभित गंध नवाळी

सूर्य उगवतो हळूहळू जणू
उषा त्यास बिलगली
निसर्गातुनी थंडीची किती
मस्त मजा चालली

चंद्र कुशीतुन निजला अजुनी
रजनी झोपाळलेली
स्वप्नं प्रियेला सांगताच मग
लाज गाली उमटली

पहाट ओली अंग चोरटी
ऋतुराणी शहारली
ऋतू थांबला न्याहळत तिजला
ती आपसुक जवळी आली

दि.२४/०१/२०२२
सकाळी ०९.०९ वा.



## (८२)
## माळ दवांची उरते

झाला निशेचा लोळागोळा
थंडी गारठली
डोळा लागतो तिचा प्रभाती
गोधडी पांघरली

अंगावरती काटा फुलला
निशा ही कुडकुडली
कुशीत शिरुनी  निशाकराच्या
लाजून गडबडली

चंद्र म्हणाला येई प्रिये तू
चांदणे मज उबदार
वर पसरले धुके बावळे
शहारे आणते फार

शीत ऋतूतील नीज गुलाबी
स्वप्नं ही उरातली
सखे सोबती प्रियवर असता
प्रीतही भरातली

ती चिडली बघ उगा रोहिणी
निशेस घेतो जवळी
म्हणून अबोला धरला तियेने
केली सूर्याला कागाळी

म्हणे दिनकरा उगवून लवकर
द्यावा मज पतीराज
शुद्ध न त्याला  निशा लाभता
चमकून जाय नभात

गाली हसला अंशुमाली अन
उषा ही प्रकटली
घट्ट मिठी ती निशाशशीची
दिनपतीमुळे सुटली

कशास येतो ऋतू हा शीतल
वेडा गारवा पसरे
रात्रींना बिलगून जाणारा
प्रियतम मजसी विसरे

इकडे निशेच्या अंगावरती
माळ दवांची उरते
प्रियतम शृंगाराच्या खुणा त्या
पुन्हा पुन्हा मनी स्मरते

दि.१९/०१/२०२२
सकाळी ०६.५३ वा.

## (८३)
## हृदयाकाशी प्रकाश

सुसाट वारा नभी पसारा
कसे कुणा सांगावे
उन्मळतील का मुळे येथली
संकटांनो पांगावे

कसे मिळूनी येता धावुनी
गडगडाट मेघांचा
वीज तळपते दिपवून डोळे
ठोका चुके हृदयाचा

सुटला वारा पिसाट झाला
आगापिछा न ठेवी
उधळून नाचत सुटला वेडा
संगे उडवून नेई

गार जाहली हवा बोचरी
अंगा येई शहारा
घरादारावर घनगंभीर त्या
आभाळाचा पहारा

प्रकाश गेला दडपून सारा
अंधाराचे राज्य
उगाच येते वरती भीती
तिचे पसरे साम्राज्य

कधी एकदा सरते मळभ हे
मोकळे हो आकाश
आत प्रकटतो स्वच्छ पांढरा
हृदयाकाशी प्रकाश

दि.२३/०७/२०२२
रात्री ०८.०९ वा.



**(८४)**

**अहा ! केवढे रम्य हे दृश्य**

प्राचीच्या भाळावरती
मळवट सूर्य हा भरतो
ती सजून धजून बसते
सोहळा देखणा ठरतो

नववधू नव्याने नेसून
भरजरी प्रकाशी शालू
कधी रक्त तांबडा रंग
कधी केशर त्यातची घालू

माथ्यावर चमचम चमके
सविता तेजाची बिंदी
ती जळात निरखून पाहे
निज लावण्य प्रतिबिंबी

अशी नटलेली नवरी
रोज प्रभाती पहावी
एक शुभेच्छा ओंजळ
तिज पदरी हो वहावी

अहा ! केवढे रम्य हे दृश्य
सोनसकाळी दिसावे
म्हणून रोजच नवीन जीवन
नव संकल्पे हसावे

दि.२९/०१/२०२३
सकाळी ०८.३८ वा.



## (८५)
## पानोपानी रंग हिरवा

पानोपानी रंग हिरवा
प्रसन्न करती छटाही सर्वा
सृष्टीराणीचा शालू बरवा
नेसून आल्या फुलास मिरवा

पर्णमाऊली, कळी ही कन्या
हट्ट करीतसे आईस आपुल्या
नेसून बघू दे हिरवा शालू
दोघी सारख्या कशा गं दिसू

रंग तुझे गं विविध किती
हिरवे सोडून आकर्षती
कशास हवा तुज रंग हरित
रंगवेडी फुलपाखरं समित

तू माझ्या रंगात रंगशील
वेगळी कळी मग ना कळशील
बघ गं फुलराणी तू असा
हट्ट व्यर्थचा सोडून जरा

नाही नाही आज मला
बघायचेच की सृष्टीला
अंगावर ऋतू हिरवा पांघरून
सगळे मज पाहतील गांगरून

हात कुणी लावील पुन्हा
खरे फुल की हा चकवा
मी लपल्यागत होईल पानी
पाहिल गम्मत तुझ्या आडोनी

असले फूल हवे गं मजला
कधी न पाहिले रंग चांगला
घे ना आई रोप असे
हिरव्या फुलांचे रूप कसे

सांगीन जाऊन सगळ्यांना
कळी अजब अन् फूल बघा
तिचा तो लाडिक हट्ट पाहुनी
मीही सजले सोबती जाण्या

आई, रंग तुझा मी लेऊन झाले
तुझ्यासारखी समजुतदार
कधी वेगळा विचार घ्यावा
मनास करीत हिरवेगार

दि. २०/७/१९
पहाटे ५.३० वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित "वैदिक साहित्याचा इतिहास" (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

''**साहित्यिक व्रत**'' म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्याय:, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा - नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये 'मंजु मंजिरी' आणि 'सर्ग निसर्ग' नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके -**

(देवभक्तीपर) - नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश, (राधाकृष्ण) - रूप-स्वरूप, श्रीरंग, कृष्णकांत, (प्रासंगिक) - मंगेश, आंदण, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (चंद्र) - सुधांशु, (सूर्य) - दिव्यांतरी, (प्रीत - तिच्या मनातील कविता) - नादश्रुती, श्वेता, (सकाळ-संध्याकाळ) - लाघव वेळा, (वेळा) - तेंव्हा, (प्रेम - त्याच्या मनातील कविता) - प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - अलवार, मधुश्री, सहा सोहळे, (फुले) - अळुमाळु, सुरभी, (पशु) - खाणाखुणा, (पक्षी) - वैष्णवी, (स्त्रीजीवन) - स्वामिनी, मृणालिनी, (धरती-आकाश) - प्रमिला, नभ मोजताना, (जीवनपर) - मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) -श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) -प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु,

(गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष -**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२-२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान - २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार - २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर - ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल-साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०

- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८
- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/maha_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/maha_governor/status/1439559859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान 'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश आमटे यांच्या आत्मचरित्राचा संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com//lokrang/sahitya-akademi-award-for-translation-autobiography-of-prakash-amte-poet-prof-dr-manjusha-kulkarni-prakashwata-zws-70-2612674/lite/?utmsource=whatsapp_web&utm_medium=social&utm_campaign=socialsharebuttons |
| ७ | https://mr.wikipedia.org | https://mr.wikipedia.org/wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी यांचा महाराष्ट्र राज्याच्या मा. राज्यपालांच्या हस्ते अभिनव साहित्यिक विक्रम केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/InfoVidarbha/status/1418559733921816580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/ITLxInwuJc ; https:/youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653335052919 8id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ४९
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ५४
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●